MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
दिशा

वर्ष चौविसावे / अंक ६ / जून २०२३

# संपादकीय

## आंतरराष्ट्रीय योग दिवस

२१ जून हा दिवस दरवर्षी जगभर 'आंतरराष्ट्रीय योग' दिवस म्हणून साजरा केला जातो. ११ डिसेंबर २०१४ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठकीत भारताचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला. त्या प्रस्तावाला उपस्थित सगळ्याच राष्ट्राच्या प्रतिनिधींनी दुजोरा दिला. त्या सभेत सर्वानुमते दरवर्षी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याचे मान्य करण्यात आले. उत्तर गोलार्धात २१ जूनला दिवस सर्वात मोठा असतो. तीच तारीख आंतरराष्ट्रीय योग दिवसासाठी ठरविण्यात आली. त्यानुसार पहिला आंतरराष्ट्रीय योग दिवस २१ जून २०१५ रोजी साजरा करण्यात आला. तेव्हापासून नियमितपणे हा दिवस साजरा करण्यात येत आहे.

'योग' ही भारताने जगाला दिलेली देणगी आहे. महर्षी पतंजली यांनी विकसित केलेल्या या पद्धतीला देशात सर्वत्र स्वीकारण्यात आले आहे. योग चिकित्सेद्वारे अनेक असाध्य रोगांवर मात करता येते. योग अभ्यासाने शारीरिक, मानसिक, बौद्धिक, सामाजिक व आध्यात्मिक स्वास्थ्य लाभते, हे अधोरेखित झाले आहे. म्हणूनच देशात अनेक ठिकाणी योग शिबिरे आयोजित केली जातात. काही शाळा आणि महाविद्यालये योग शिक्षण देण्याचा प्रयत्न करतात. काही स्वयंसेवी संघटना योग शिक्षणाचा प्रसार करण्याचे काम करतात.

काही योगप्रेमी व्यक्तींनी योग कला परदेशात देखील नेली. त्यामुळे जगाच्या काही भागांत योगाचा प्रचार झाला. परंतु हे प्रयत्न वैयक्तिक पातळीवरचे होते. योग या भारतीय ज्ञानाचा जगभर प्रसार करण्याचे पद्धतशीर प्रयत्न मात्र झाले नाहीत. त्याची सुरुवात 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' साजरा करण्याने झाली. या प्रयत्नांना चांगले यश मिळत असून, योगासंबंधीची जाणीव सगळीकडे पसरताना दिसते आहे. परंतु ही जाणीव केवळ योगासनापुरती मर्यादित आहे. योग ही एक विस्तृत संकल्पना आहे. यामध्ये हठयोग, ज्ञानयोग, भक्तीयोग इत्यादी बाबींचा समावेश होतो. यापैकी हठयोगाचाच प्रचार करण्याचे प्रयत्न होत आहेत. त्यातही भर शारीरिक हालचालींवर आहे. 'हेही नसे थोडके' असे म्हणून जे चालले आहे त्यात समाधान मानण्याची प्रवृत्ती बळावत आहे. असे करण्याने योग शास्त्र चुकीच्या पद्धतीने जगापुढे येईल. ते होऊ नये यासाठी योग शास्त्र पूर्णत्वाने समजेल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. या विषयावर ग्रंथ निर्मिती करून ती अल्पदरात उपलब्ध करून दिली पाहिजे. आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या निमित्ताने

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

योग्य वातावरण निर्मिती झाली आहे. त्याचा उपयोग करून योगाची विस्तृत संकल्पना जगापुढे ठेवणे आता शक्य झाले आहे. असे केले तरच आपण 'विश्व गुरू' चे स्थान प्राप्त करू शकू.

या महिन्याच्या २१ तारखेला साजरा केला जाणारा हा 'नववा आंतरराष्ट्रीय योग दिवस' असेल. प्रत्येक योग दिवसाचे एक ब्रीद ठरविण्यात येते. नवव्या आंतरराष्ट्रीय योग दिवसाचे ब्रीद आहे 'वसुधैव कुटुंबकम्'. याचा अर्थ, 'सर्व जग एक कुटुंब आहे आणि सर्व लोक या कुटुंबाचे सभासद आहेत' असा होतो. वसुधैव कुटुंबकम् हा विचार महान संत ज्ञानेश्वर महाराजांनी मांडला. परस्परातील मतभेद विसरून सर्वांनी कुटुंबातील सभासदाप्रमाणे एकत्र राहावे अशी त्यांची मनिषा होती. त्यासाठी एकमेकांत सलोखा निर्माण होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने भारत प्रयत्न करीत आहे. या प्रयत्नांना लवकरच यश येईल अशी आशा करू या. २१ जून २०२३ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठकीत आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात येणार आहे. त्याला भारताचे पंतप्रधान स्वतः हजर राहून मार्गदर्शन करणार आहेत.

देशपातळीवर नवव्या आंतरराष्ट्रीय योग दिवसासाठी अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्यातील एक म्हणजे योगाचे महासागर रिंग तयार करणे हे होय. जगभरातील नऊ बंदरे कॉमन योग प्रोटोकॉल प्रात्यक्षिकात भाग घेतील. ज्या राष्ट्रांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे त्या राष्ट्रांमध्ये बंदरे, शिपिंग आणि जलमार्ग मंत्रालयाद्वारे प्रात्यक्षिके आयोजित केली आहे. योग भारतमाला ही दुसरी संकल्पना आहे. योग प्रात्यक्षिकांची साखळी भारतीय लष्कर, भारतीय नौदल, भारतीय वायुसेना, सीमा रस्तेबांधणी संघटना अशा अनेक संस्था एकत्रितपणे सादर करीत आहेत. योग सागरमाला भारतीय किनारपट्टीवर योगासने दाखवणार आहे. आयएनएस विक्रांतच्या वरच्या डेकवर योग प्रात्यक्षिक होणार आहेत. 'हर आंगन योग' ही तिसरी संकल्पना आहे. अंगणवाड्या, आरोग्य आणि कल्याण केंद्रे आणि शैक्षणिक संस्थांद्वारे गावागावांमध्ये योग शिबिरे आयोजित करणे यामुळे शक्य झाले आहे. जागतिक आरोग्य संघटनेने भारत सरकारच्या सहकार्याने योगासाठी थकजाधेसर हे ॲप तयार केले आहे. यात योगासन शिकविण्यासाठी आणि पाहण्यासाठी व्हिडिओ आणि ऑडिओ फाईल्सचा संग्रह आहे. हे ॲप वापरण्यास सोपे आणि त्याच्या वापरासाठी शुल्क देखील पडत नाही. हा जागतिक आरोग्य संघटना आणि आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघ यांच्यातील संयुक्त उपक्रम आहे.

योग हा जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये संतुलन ठेवण्याचे काम तर करतोच, याशिवाय मानवी आरोग्य आणि कल्याणासाठी एक समग्र दृष्टीकोन प्रदान करतो. यामुळेच सर्वांगिण आरोग्य क्रांतीचे युग सुरू झाले आहे. ज्यामध्ये रोग झाल्यावर उपचार करण्याऐवजी प्रतिबंधावर अधिक लक्ष दिले आहे. खरे तर हीच भारतीय संस्कृती आहे. रोग होऊ नये यासाठी प्रयत्नशील राहा. करो योग... रहो निरोग असा हा कानमंत्र आहे.

भारतीय समाज हा ज्ञानाधिष्ठित समाज आहे. मानवाच्या कल्याणासाठी येथील विद्वानांनी विविध शाखांमध्ये ज्ञाननिर्मिती केली आहे. योग शास्त्राबरोबरच भारतीय विद्वानांनी आयुर्वेद शास्त्र देखील विकसित केले आहे. आजार होऊच नयेत यासाठी आपली जीवनशैली कशी असावी आणि आजार झालाच तर औषधोपचार कसे करावेत याची माहिती या शास्त्रात उपलब्ध आहे. योग शास्त्राबरोबरच आपला हा अमर ठेवा जगात सर्वदूर पोहोचविणे आवश्यक आहे. त्यासाठी देखील प्रयत्न करणे गरजेचे आहे. लवकरच यादृष्टीने प्रयत्न केले जातील अशी आशा बाळगू या.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

**वर्ष चोविसावे/अंक ६/जून २०२३**

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | भारतातून चीनला गेलेला बौद्धधर्मप्रसारक – कुमारजीव | जयंत कुलकर्णी | ३ |
| ३) | एक विज्ञानव्रती तारा निखळला..! | दयानंद सावंत | ८ |
| ४) | स्वातंत्र्यवीर सावरकर : परिचित, अपरिचित : पुस्तक परिचय | चन्द्रशेखर टिळक | १२ |
| ५) | श्रीपाद वल्लभ दिगंबरा... | सुभाष गंगाराम शिंदे | १४ |
| ६) | पुरोगामिनी सावित्री | विनीता तेलंग | १७ |
| ७) | महिला कुस्तीपटूच्या आंदोलनातील विविध पैलू | विनोद एच वाघ | २१ |
| ८) | इंद्रजीत वध आख्यान अर्थात सती सुलोचना! | माधव भोकरीकर | २४ |
| ९) | आभाळ आणि मातीमध्ये : दासू वैद्य यांची कविता | डॉ. आनंद कुलकर्णी | २८ |
| १०) | दैत्यसूदन मंदिर | दिलीप नारायण वंडलकर | ३० |
| ११) | परिसर वार्ता | | ३३ |


**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

‘दिशा’ प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २७ वे/अंक १२ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.

  **Email : vpmt1935@gmail.com**
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

– संपादक

# भारतातून चीनला गेलेला बौद्धधर्मप्रसारक- कुमारजीव

*भारतातून चीनला बौद्ध धर्माचा प्रचार करावयास गेलेल्या कुमारजीव यांच्याबद्दल लेख – संपादक*

कुमारजीवाचे काम खरोखरच आपल्याला अचंबित करणारे आहे. त्यांनी जवळजवळ १०० संस्कृत ग्रंथांचे चिनी भाषेत भाषांतर केले आणि एवढ्यावरच न थांबता त्यांनी सुरू केलेल्या या कामात सामील होण्यासाठी दुसरी फळी उभारली. या त्यांच्या शिष्यांनीही त्यांचे काम मोठ्या जोमाने पुढे चालू ठेवले. हे त्यांचे यश फार मोठे म्हणावे लागेल. त्यांचे शिष्य नुसते हे काम करून थांबले नाहीत, तर सुप्रसिद्ध फा-इन सारख्यांनी बौद्ध धर्माचा प्रसारही चीनमधे केला.

या काळातील काही बौद्ध धर्मगुरुंची ही नावे पहा – धर्मरक्ष, गौतम संघदेव, बुद्धभद्र, धर्मप्रिय, विमलाक्ष व पुण्यत्राता. या सर्वांचे काम आपण थोडक्यात बघणार आहोत.

धर्मरक्ष ३८१ साली चीनमधे आला व त्याने त्या अवघड भाषेचा अभ्यास करून अनेक ग्रंथाचे भाषांतर केले. उदा. १) मायाकाराभद्ररिद्धीमंत्र सूत्र २) नरकसूत्र, ज्यात बुद्धाने नरक या संकल्पनेवर भाष्य केले आहे. ३) शिलगुणगंध सूत्र ४) श्रामण्यफळसूत्र.

याच्यानंतर आला गौतम संघदेव. हा एक काश्मीरचा श्रमण होता. याने ३८८ साली त्यावेळच्या चिनी राजधानीत, म्हणजे खान आन या शहरात पाऊल टाकले. त्यावेळी तेथे फु राजघराणे राज्य करीत होते. त्याने जवळजवळ ७ ग्रंथांचे भाषांतर केले. त्याने भाषांतर केलेल्या काही महत्त्वाच्या ग्रंथांची नावे आहेत – मध्यमागम सूत्र, हा एक हिनयान पंथाचा ग्रंथ आहे. दुसरा आहे – अभिधर्महृदयशास्त्र. ३९१ साली त्याने त्रिधर्मसूत्राचे भाषांतर केले.



चीनमधील कुचा येथील कुमारजीवाचा सुंदर पुतळा

३९८ साली चीनमधे आला बुद्धभद्र. हा शाक्य होता. साधारणत: त्याच काळात कुमारजीवाला पकडून चीनमधे आणण्यात आले. कुमारजीवाने याच बुद्धभद्राचा अनेक वेळा त्याच्या कामात सल्ला घेतला असे म्हणतात. या बुद्धभद्राला कुमारजीवाबरोबर काम करण्याची संधी मिळाली. याचाच सहाध्यायी होता जगप्रसिद्ध फा-ईन. कुमारजीवाच्या मृत्यूनंतर जेव्हा फा-ईन भारताचा प्रवास करून चीनमधे परतला तेव्हा याने त्याच्याबरोबर संघासाठी नियमावली असणारा ग्रंथ लिहिला. तो म्हणजे विनयपीटिका. २५० साली नियमावली नसल्यामुळे आपण पाहिले आहे की, धर्मकालाने पहिला प्रतिमोक्ष हा ग्रंथ लिहिला होता. बुद्धभद्राने त्यातील काही भाग उचलून त्यावर सविस्तर भाष्य केले आणि एक नवीन ग्रंथ रचला ज्याचे नाव त्याने ठेवले – प्रतिमोक्षसंघिकामूल. संघ वाढत असल्यामुळे त्यात शिस्त आणण्यासाठी विनयग्रंथाची त्याकाळात फारच जरूरी भासल्यामुळे हे काम तत्परतेने उरकण्यात आले. बुद्धभद्राने चीनमधे ३१ वर्षे काम केले. तो भारतात परत आला नाही. त्याने चीनमधेच आपला प्राण ठेवला तेव्हा त्याचे वय होते

७१. त्याचे सात ग्रंथ आजही चीनमधे जपून ठेवले आहेत ते खालीलप्रमाणे - (तीन ग्रंथांची नावे आधी येऊन गेलेली आहेत)

१ महावैपुल्य सूत्र ज्यात खुद्ध बुद्धाची भाषणे दिली आहेत.

२ बुद्धध्यानसमाधीसागर सूत्र

३ मंजुश्री प्रणिधानपद सूत्र


४ धर्मताराध्यान सूत्र

बुद्धभद्राच्या थोडे आधी अजून एक धर्मगुरू काबूलवरून चीनमधे येऊन गेला. त्याचे नाव होते संघभट. पण त्याच्याबद्दल आजतरी काहीच माहिती उपलब्ध नाही. अजून किती पंडित चीनमधे या कामासाठी दाखल झाले असतील याची आज आपल्याला कल्पना नाही. कित्येक ग्रंथ कम्युनिस्ट राजवटीत नष्ट करण्यात आले असावेत किंवा कुठल्यातरी सरकारी ग्रंथालयात धूळ खात पडले असतील. ते जेव्हा केव्हा बाहेर येतील तेव्हा अजून बरीच माहिती उपलब्ध होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याच काळात अजून एका महत्त्वाच्या कामास सुरुवात झाली ती म्हणजे चिनी धर्मगुरुंनी संस्कृत शिकण्यास सुरुवात केली. ही कल्पना कुमारजीव यांच्या एका शिष्याची, फा-ईनची.

३८८ साली संघभटाने कात्यायनीपुत्र रचित विभासशास्त्राचे चिनी भाषेत भाषांतर केले जे चीनमधे 'पि-फो-शालून' या नावाने ओळखले जाते. या ग्रंथाचे एकुण १८ भाग आहेत. त्याच वर्षी त्याने आर्य वसुमित्र बोधिसत्त्व संगीतीशास्त्र या ग्रंथाचे भाषांतर केले. ३८४ साली त्याने बुद्धचरितसूत्राचे भाषांतर केले. हा मूळ ग्रंथ संघरक्षाने रचिला होता.

३८२ साली अजून एका धर्मप्रिय नावाच्या श्रमणाने एका महत्त्वाच्या ग्रंथाचे भाषांतर केले ज्याचे नाव होते महाप्राज्ञपरिमित सूत्र. हे प्रसिद्ध दशसहस्रिका प्राज्ञ परिमिता या ग्रंथाचा काही भाग आहे.

थोडक्यात काय, भारतातून चीनकडे जाणाऱ्या पंडितांचा ओघ सारखा वाढत होता व त्यांनी तेथे अचाट काम केले. नवीन धर्माचा प्रसार करताना नवबौद्धांना संदर्भासाठी ग्रंथ लागतील हे ओळखून त्यांनी ग्रंथाच्या भाषांतराचे काम प्रथम हाती घेतले आणि अतोनात कष्टाने तडीस नेले. हे करताना त्यांनी बौद्ध धर्माचा प्रसार करण्याचे थांबविले नव्हते. त्यासाठी त्यांनी राजाच्या आश्रयाने मठ बांधले. तेथे संघांना आसरा दिला. त्यांच्यासाठी चिनी भाषेत नियमावली लिहिल्या.




या सर्व कामात भारताच्या मध्य भागातून अनेक पंडित चीनला गेले; पण काश्मीरातूनही अनेकजण गेले हे विसरून चालणार नाही. हे वाचल्यावर एक विचार मनात येतो, - काश्मीरमधील सध्याच्या युवकांना हा इतिहास माहिती असेल का ? तो जर त्यांना सांगितला तर काही फरक पडेल का ?

(शक्यता कमीच आहे. पण मधे एका पाकिस्तानी कार्यक्रमात एका बाईने एका अतिरेक्याला सडेतोड उत्तर दिले होते...ती म्हणाली, 'आमचा अरबस्तानाशी कसलाही संबंध नाही. अरब हे आमच्या भूमिवरील आक्रमक होते. हिंदूशाहीचा राजा दाहीर हाच आमचा हिरो असायला हवा. आम्ही प्रथम हिंदू होतो, नंतर बौद्ध झालो व त्यानंतर ख्रिश्चन व मुसलमान हे आम्ही विसरू शकत नाही...' असे उत्तर देणारी पिढी जेव्हा

जेव्हा मन व हृदय दोन्ही शांत असतात, तेव्हाच मनुष्याला खरी शांती मिळते!

काश्मीरात तयार होईल तो दिवस भारताच्या व काश्मीर खोऱ्याच्या भाग्याचा.) असो.

आता आपण कुमारजीव या महान ग्रंथकर्त्याकडे वळू. कुमारजीवाचे पिता हे भारतीय होते. अर्थात त्याचवेळेचा भारत ज्यात अफगाणिस्तानही मोडत होते. कुमारजीवाचे वडील 'कुमारयाना' हे काश्मीरमधे एका राज्याच्या पंतप्रधानपदी कार्यरत होते. त्यांच्यावर बौद्धधर्माचा एवढा प्रभाव पडला की, पामीरच्या डोंगर रांगा पार करून ते कुचाला गेले. तेथे ते आल्याची कुणकुण लागल्यावर तेथील राजाने त्यांची त्वरित राजगुरुपदी नेमणूक केली. त्याकाळी गुणवंतांची कदर अशा प्रकारे व्हायची. विद्वान पंडितांसाठी त्याकाळी युद्धे होत असत असा तो काळ. तर कुचाला हा राजगुरू असताना कुचाची राजकन्या – जिवाका त्याच्या प्रेमात पडली व तिने त्याच्याशीच विवाह करण्याचा हट्ट धरला. अर्थातच तो पुरा करण्यात आला. यांना जो पुत्र झाला त्याच्या नावात मातापित्यांचे नाव गुंफण्यासाठी त्याचे नाव ठेवण्यात आले कुमार + जिवाका. म्हणजेच कुमारजीवा. कुमारजीवाचा जन्म साधारणत: ३३४ त ३४४ या काळात झाला असावा. तो सात वर्षांचा असताना त्याची आई एका भिक्षुणीसंघात दाखल झाली. असे म्हणतात (जरा अतिशयोक्ती वाटते) की, तो सात वर्षांचा असतानाच त्याची अनेक सूत्रे तोंडपाठ होती. तो नऊ वर्षांचा झाल्यावर त्याच्या आईने त्याला काश्मीरला नेले व शिक्षणासाठी शिक्षकांचा जो शिक्षक बंधुदत्त त्याच्याकडे सोपविले. या प्रवासादरम्यान त्यांना एक अरहत भेटला ज्याने कुमारजीवाचे भविष्य सांगितले असे म्हणतात. आजवर कुमारजीवाचा अभ्यास हिनयानाच्या सर्वास्तिवादी तत्त्वज्ञानाच्या अभ्यासापुरता मर्यादित होता. येथे त्याला वेदांचा व तंत्रविद्या, खगोलशास्त्र या विषयांचा अभ्यास करण्यास मिळाला व याचवेळी त्याची महायानाच्या तत्त्वज्ञानाशी ओळख झाली. या शिक्षणाचा अजून एक फायदा त्याला झाला आणि तो म्हणजे त्याची ओळख अतिविशाल हिंदू ग्रंथविश्वाशी झाली. थोड्याच काळात तो त्यात पारंगतही झाला. महायानाची ओळख झाल्यावर तर त्याने एका ठिकाणी म्हटले आहे की, 'मी इतके दिवस दगडाला सोने समजत होतो. आता मात्र माझी ओळख खऱ्या सोन्याशी झाली आहे.' (मला मात्र हे काही विशेष पटले नाही. खरे तर हिनयानपंथाचे तत्त्वज्ञान जास्त मूलभूत स्वरूपाचे आहे. मला तरी वाटते महायानात हिंदू तत्त्वज्ञान भरपूर घुसडलेले आहे. उदा. बोधिसत्त्वाची कल्पना. हे चूक असू शकेल!) गंमत म्हणजे त्याला या अभ्यासात यारकंदचा राजपुत्र सत्यसोमाची खूपच मदत झाली. गुगलअर्थवर यारकंद कुठे आहे हे जरूर पहावे.

काशघरला एक वर्ष काढल्यावर कुमारजीव कुचाला परतला. कुचामधे राजदरबाराच्या पाठिंब्याने त्याचे भव्य स्वागत करण्यात आले. यानंतर मात्र तो जवळजवळ वीस वर्षे कुचामधे राहिला. हा काळ त्याने महायानाचे तत्त्व समजून घेण्यात व्यतीत केले. ते तत्त्वज्ञान पटल्यावर त्याने महायानपंथाचा स्वीकार केला. एवढ्यावरच न थांबता त्याने त्याच्या गुरुंनाही हे तत्त्वज्ञान समजावून सांगण्याचे ठरविले. त्याला अशी आशा होती की, गुरूंना पटल्यावर तेही या पंथाचा स्वीकार करतील. त्याने बंधुदत्तांना कुचास येण्याचे आमंत्रण दिले. आपल्या गुरूला महायानाची थोरवी सांगताना कुमारजीवाने त्यांच्या समोर शून्यतेची कल्पना व तत्त्व मांडले. ते सगळे शांतपणे ऐकल्यावर बंधुदत्तांनी, 'सगळे शून्य आहे, किंवा सगळे विश्व शेवटी मिथ्या आहे, हे म्हणणे म्हणजे फुकाची बडबड आहे' असे म्हणणे मांडले. ते सिद्ध करण्यासाठी त्यांनी एक कथा कथन केली –

एका विणकराकडे एक वेडसर माणूस आला व त्याने त्याला सगळ्यात तलम धागा विणण्यास सांगितला.

---

रागात असताना कोणतीही महत्त्वाची कृती करू नये, अथवा कोणालाही 'शब्द' देऊ नये!

तो पाहिल्यावर त्याने तो जाड असल्याचे त्या विणकराला सांगितले.

''पैशाची काळजी करू नकोस. मला तलमात तलम धागा विणून दाखव !''

विणकराने त्याला दुसऱ्या दिवशी येण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी तो धागा पाहिल्यावर त्या माणसाने तो जाड असल्याचे सांगितले. विणकराला राग आला पण त्याने तो आवरला व त्याला परत दुसऱ्या दिवशी येण्यास सांगितले. तिसऱ्या दिवशी विणलेला धागा पाहून त्या माणसाने तोही जरा जाडसर असल्याचे सांगितल्यावर विणकराला आला राग. हवेत बोट दाखवून तो म्हणाला,

''तो बघ तुला पाहिजे तसा धागा तेथे आहे.'' हवेत काहीच न दिसल्यामुळे त्याने विचारले, ''कुठे आहे तो धागा? मला तर दिसला नाही''

''तो इतका तलम झाला आहे की, नुसत्या नजरेस दिसणे शक्यच नाही'' विणकराने उत्तर दिले.

त्या उत्तराने त्या माणसाचे समाधान झाले.

''या धाग्याचे एक वस्त्र विणून मला उद्या दे. ते मला राजाला भेट द्यायचे आहे'' असे म्हणून त्या माणसाने त्याचे पैसे मोजले व तो तेथून निघून गेला.

आता हे स्पष्टच आहे की, असा कोणताही धागा तेथे नव्हता व त्याचे पैसे मोजायचेही काही कारण नव्हते. त्याचप्रमाणे महायानातील शून्यता या कल्पनेत/तत्त्वज्ञानात काहीच अर्थ नाही व त्यात वेळ घालविण्यात काही कारण नाही हे स्पष्ट आहे.

हे मात्र मला पटले. पण कुमारजीवाला मात्र स्वत:च्या गुरूचे मतपरिवर्तन करण्यात नंतरच्या काळात यश मिळाले. त्याच्या म्हणण्यास मान्यता देऊन त्याच्या गुरूंनी महायानपंथाची शिकवण स्वीकारली.

३७९ साली एक सेंग-जुन नावाचा चिनी महंत कुचाला आला होता. त्याने कुमारजीवाची माहिती चीनच्या राजाला (सम्राट जिन. राजधानी : चँगन) एका अहवालात पाठविली. सम्राटाने तो अहवाल वाचून कुमारजीवाला चीनमधे आणण्याचे प्रयत्न सुरू केले. जवळजवळ दोन दशके प्रयत्न करून तो निराश झाला. हे प्रयत्न विफल झाले त्याला कारण होते सम्राटाचाच एक सेनापती लु-कुआंग. या सेनापतीने कुमारजीवाचे महत्त्व न ओळखता आल्यामुळे त्याला अटक करून सतरा वर्षे तुरुंगात टाकले. (हा बौद्धधर्मीय नव्हता. तो धर्माच्या विरुद्ध होता का नाही याबद्दल माहिती उपलब्ध नाही. काही जणांचे असेही म्हणणे आहे, - त्या काळात तो इतका ताकदवान झाला होता की, त्याने जवळजवळ राजा विरुद्ध बंडच पुकारले होते.) राजदरबारातून कुमारजीवाला राजधानीत पाठविण्याचे सारखे आदेश निघत होते. इकडे कुमारजीवाने सर्वस्तीवादी विनयाचा अभ्यास सुरू केला होता. यावेळी त्याच्याबरोबर होता पंजाबमधील (किंवा उत्तर भारत म्हणू या) एक पंडित ज्याचे नाव होते विमलाक्ष. (हा एक उत्तर भारतीय भिक्खू होता ज्याने कुचाच्या दिशेने प्रस्थान ठेवले होते. जेव्हा चिन्यांनी ३८३ मधे कुचावर हल्ला करून ते काबीज केले तेव्हा याने तेथून पळ काढला. नंतर जेव्हा त्याला कुमारजीव चँगनमधे आहे हे कळले तेव्हा तोही चँगनला गेला. कुमारजीवाचा मृत्यू झाल्यावर याने तेथे बरेच काम केले. हा त्याच्या ७७ व्या वर्षी तेथेच मृत्यू पावला)

३६६-४१६ या काळात त्सिन् घराण्याची सत्ता चँगनवर प्रस्थापित झाली. याचा एक राजा याओ त्सिंग हा बौद्धधर्माचा फार मोठा चाहता होता. त्याने या धर्माला उदार राजाश्रय दिला होता. असे म्हणतात त्याच्या काळात त्याने ३००० श्रमणांना सांभाळले होते. याच्या दरबारात प्रवेश मिळाल्यावर कुमारजीवाचे भाग्य

उजळले. या राजाने त्याला त्याच्या राज्यात बौद्ध धर्माचा प्रसार करण्याची आज्ञा दिली व बौद्धधर्माचा चीनमधील मार्ग मोकळा झाला. एकदा राजाश्रय मिळाल्यावर कुमारजीवाने भाषांतराचे काम मोठ्या धडाडीने हाती घेतले. त्याने जवळजवळ ९८ ते १०० बौद्ध संस्कृत ग्रंथांचे चिनी भाषेत भाषांतर केले. त्यातील काहींची नावे आपण अगोदरच पाहिली आहेत. त्याने स्वत: काही ग्रंथ रचले का नाही याबद्दल आजतरी काही माहिती उपलब्ध नाही. बहुतेक त्यासाठी त्याला वेळच मिळाला नसावा.

कुमारजीवाची मातृभाषा ना संस्कृत होती ना चीनी. तरीही त्याने हे भाषांतराचे काम पार पाडले याबद्दल त्याचे आभारच मानले पाहिजेत. कदाचित कुचामधे असताना त्याला चिनी भाषेची तोंडओळख झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. पण हे खरे मानले तरीही त्याने फार अवघड काम पार पाडले असेच म्हणावे लागेल.. संस्कृतमधून चिनी भाषेत भाषांतर करताना त्याने स्वत:ची एक स्वतंत्र शैली निर्माण केली. त्यामुळे ती सगळी भाषांतरे ही चिनी भाषेतील मूळ लेखनच वाटते. असे म्हणतात की, त्याची शैली ही ह्युएनत्संगपेक्षा श्रेष्ठ आहे. वरील ९८ ग्रंथांचे ४२५ भाग आहेत. यावरून हे काम किती प्रचंड असेल याची कल्पना येते. यातील ४९ ग्रंथांची नावे चिनी त्रिपिटिकात लिहून ठेवली आहेत. त्याची नावे येथे विस्तारभयापोटी देत नाही. ही यादी आपण जर नीट पाहिली तर आपल्या एक गोष्ट लक्षात येईल की, यात तांत्रिकविद्येवरील एकही ग्रंथ नाही. ह्युएनत्संगच्या काळात मात्र या विषयावरील ग्रंथांचा चीनमधे बराच बोलबाला झाला. त्याने अश्वघोष व नागार्जुन यांची चरित्रं लिहिली, ती चीनमधे बरीच लोकप्रिय झाली.

कुमारजीवाची लोकप्रियता इतकी वाढली की, असे म्हणतात त्या काळात त्याच्याकडे १००० श्रमण शिकत होते. फा-ईन हा त्याचाच एक शिष्य. याने भारतात जाऊन बुद्धाच्या सर्व पवित्र ठिकाणांना भेटी दिल्या व कुमारजीवाच्या आज्ञेने त्याचे प्रवासवर्णन लिहिले. त्यानेही अनेक ग्रंथ भारतातून चीनमधे नेले. आपल्या शिष्याची कीर्ती पाहण्यास कुमारजीवाचा गुरू विमलाक्ष चीनमधे आला, पण दुर्दैवाने विमलाक्षाच्या आधी कुमारजीवाचा मृत्यू झाला. विमालाक्षाने आपल्या शिष्याचे काम पुढे नेले व 'दशाध्याय विनय निदान' नावाच्या ग्रंथाचे चिनी भाषेत भाषांतर केले. हेही वयाच्या ७७व्या वर्षी चीनमधे मरण पावले.

कुमारजीवाच्या काळात काश्मीरमधून अजून एक पंडित चीनमधे आला. त्याचे नाव होते पुण्यत्रात. यानेही कुमारजीवाच्या प्रभावाखाली दशाध्यायविनय व सर्वस्तिवाद् विनय या दोन ग्रंथांचे भाषांतर केले.

एक लक्षात येते की, काश्मीर भागातून अनेक श्रमण चीनमधे येत - जात होते व तेथे अगोदरच स्थायिक झालेल्या पंडितांच्या मार्गदर्शनाखाली कठोर परिश्रम करीत होते. आता त्यांच्यापैकी काहींची नावे व त्यांचे काम पाहू या.. पुढच्या भागात......

**- जयंत कुलकर्णी**
ज्येष्ठ अभ्यासक
पुणे

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*
०२२-२५४२ ६२७०

# एक विज्ञानव्रती तारा निखळला..!

*विज्ञान भारती या नामांकित संस्थेचे कार्य सर्वदूर पोचवणारे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री जयंतराव सहस्रबुद्धे यांचे २ जून २०२३ रोजी दुःखद निधन झाले. त्यांचे परिचित श्री दयानंद सावंत यांनी त्यांच्या आठवणींना प्रस्तुत लेखात उजाळा दिला आहे - संपादक*

युरेकाचे मार्गदर्शक व विज्ञान भारतीचे अखिल भारतीय संघटन मंत्री श्री जयंतराव सहस्रबुद्धे यांचे दिनांक २ जून २०२३ च्या पहाटे निधन झाले.



त्यांचे शिक्षण B.Sc. Tech Electronics. शिक्षणात नेहमीच सर्वोत्कृष्ट. BARC मध्ये काही काळ नोकरी केली. स्वामी विवेकानंद आणि विज्ञान यांवर व्याख्याने दिली. P C Ray यांच्या जीवन तसेच कामावरील व्याख्याने, तसेच जगदीश चंद्र बोस, भगिनी निवेदिता आदींच्या जीवनावरील अभ्यास आणि व्याख्याने दिली. २००७ पासून विज्ञान भारतीचे अखिल भारतीय संघटन मंत्री. या कार्यकाळात अनेक आयाम विकसित झाले. यात, VVM, GIST, Shakti - महिलांनी चालवलेले विज्ञान संघटन, Need - National Environment Energy Development mission, वेद विज्ञान संमेलन. NASYA - National Ayurveda Students Youth Association (एका वेळेस अनेक लोकांना दिली गेलेली ट्रीटमेंट) या बद्दल guiness world रेकॉर्ड मध्ये नोंद. Tech for Seva , World Ayurveda Congress,

IISF - India International Science Festival आयोजित केले. मागील वर्षी IISF मध्ये एकत्रित काही हजार विद्यार्थ्यांनी केलेले विज्ञानाचे प्रयोग याची नोंद Guiness book of world रेकॉर्ड मध्ये करण्यात आली आहे. IIWM - International Institute of Waste Management, IIEFA - Industries Innovators Entrepreneurs Fecilitators Academia इत्यादी जयंतरावांच्या मार्गदर्शनाखाली चालू होत्या आणि नवनवीन शिखरे पादाक्रांत करीत आहेत.

२०१६ पासून जयंतराव यांचे युरेका सायन्स करता सतत मार्गदर्शन लाभत आले आहे. आपल्या प्रत्येक कार्यक्रमाला त्यांचे नेहमी प्रोत्साहन असायचे. Action Research project, Science teacher workshop असे अनेक विज्ञानाचे कार्यक्रम त्यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आले.

वर्ष १९९२ किंवा ९३ असेल, गोव्यात जयंतरावांनाच भेटण्यासाठी प्रवास होता. विषय स्वाभाविक ईशान्य भारत! पणजीतील संघ कार्यालयात पहिल्यांदाच भेट होत होती. दुपारी बाराचा सुमार, गेल्या गेल्या अगोदर हातपाय धुवायला सांगून, सोबत जेवणाच्या पंगतीला बसवले. गोवा विभाग प्रचारक म्हणून जबाबदारी असल्याचं कळलं. ओळखपाळख झाल्यावर, ज्या उद्देशाने भेट ठरली होती ते म्हणजे..., ईशान्य भारतातील पर्यटन विषयक काही कल्पना घेऊन, पर्यटकांचे आवागमन करण्यासाठी कशा व्यवस्था निर्माण करावयास हव्यात यावर सविस्तर चर्चा झाली. वामकुक्षी झाल्यावर, लगेच दुचाकीवरून राजू सुकेरकर, रघुनंदन सामंत, सलील सावकार इत्यादींबरोबर भेट-परिचय करून देण्यासाठी

स्वतः जयंतराव आले होते. हळुवार आवाजातील उमटणाऱ्या प्रत्येक शब्दाच्या आपुलकीतून, मतीतार्थासहित त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची प्रतिमा मनावर सहजपणे कधी कोरली गेली कळलंच नाही.

संघशिक्षा वर्गात आवर्तन ध्यानाची तासिका घेताना अजून एका वेगळ्या जयंतजींचा परिचय झाला. शवासनाच्या स्थितीत कानावर पडणारा प्रत्येक शब्द अंतरात्म्यात भिनभिनत होता. ते सूचना देत होते त्याप्रमाणे, मेंदूसहित शरीराचा प्रत्येक अवयव आज्ञा स्वीकारून शांत निश्चल आणि ताजातवाना होत होता. शब्दांवरील प्रभुत्व आणि त्याचे प्रसारण यावर जयंतजींची अद्भुत पकड असल्याची साक्षात अनुभूती मिळाली.

त्यानंतर कालांतराने कोकण प्रांताची प्रचारक म्हणून जयंतरावांना जबाबदारी मिळाल्यावर बऱ्याच वेळा भेटीगाठी होऊ लागल्या. हळुवार आवाजातील तोच गोडवा कालपर्यंत तसाच होता. मुंबई आयआयटी मधून B Tech पदवी संपादन केल्यावर संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते, प्रचारक म्हणून कार्याला सुरुवात केल्याचं समजलं. प्रत्येक विषयातील तंत्रशुद्ध अभ्यास आणि ज्ञान त्यांच्याशी होणाऱ्या गप्पांमधून अगदी सर्वसामान्य व्यक्तीला सुद्धा सहज उमजणारे होते. तेव्हा सातत्याने वाटायचं की, संघाने या व्यक्तीने मिळविलेल्या शिक्षणाच्या दृष्टीने जबाबदारी देण्याची नितांत गरज आहे, अनेक जणांकडे हा विषय त्यावेळेस स्पष्टपणे बोलूनही दाखवला होता.

जयंतरावांशी ९६ ते २००६ दरम्यानच्या काळात अचानक संपर्क तुटला होता. पण ते स्मरणातून जाणे केवळ अशक्य होते. एका शैक्षणिक संस्थेत सक्रिय असताना, विद्यार्थ्यांच्या नवनवीन कल्पनांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने काही उपक्रम राबविताना जयंतजींची स्वाभाविक आठवण व्हायची. जेव्हा त्यांच्याकडे 'विज्ञान भारती' या संघटनेची अखिल भारतीय संघटनमंत्री म्हणून जबाबदारी आल्याचे कळलं तेव्हा अत्यानंदच झाला होता. २०१३ रोजी 'नवनिर्मित डिजिटल मायक्रोस्कोप' काही शाळांना वाटपाच्या निमित्ताने, विज्ञान विषयक SCOPE या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सदस्यांशी चर्चा करताना, स्वाभाविकपणे जयंत सहस्रबुद्धे यांना प्रमुख वक्ते म्हणून बोलवायचं का असा शब्द बाहेर पडताच लागलीच भावे म्हणाले, अहो, मी त्यांना अगदी जवळून ओळखतो, आमच्या गिरगावातलेच ते. त्यांच्याशी भेट घेऊन सविस्तर विषय बोलताना, बाल्यावस्थेपासून विद्यार्थ्यांच्या तनमनावर विज्ञान विषय हसतखेळत कोरण्यासाठी संशोधन प्रोत्साहन प्रकल्पाची कल्पना मांडली. ती ऐकताच अशी काही प्रेरणा आमच्या मनात भरली की, आम्ही जोमाने त्या पूर्ततेच्या कामात विविध लोकांना जोडायला सुरवात केली. त्या कार्यक्रमातील त्यांच्या वक्तृत्वाने जवळपास साठ शाळांतील आलेल्या सर्व शिक्षकांसहित उपस्थित सर्वजण भारावून गेले होते. त्यातील अनेक शिक्षकांना संघ, विज्ञान भारती काय ते माहीत नव्हते, पण जयंतरावांच्या त्या वक्तृत्वाने संघाचा विज्ञान विषयीचा दृष्टिकोन सहजरीत्या उमगला होता.

काही दिवसांनी जयंतरावांनी आम्हाला एक विज्ञान भारतीच्या सर्वसाधारण सभेला बोलावले. सभा संपल्यावर आमच्याकडे दोन अर्ज देत, हे पूर्ण भरून द्या, आणि विज्ञान भारतीचे आजीव सदस्य व्हा.., असा जणू आदेशच दिला. त्यांच्या शब्दाच्या पुढे बोलणे ते कसले !

कालांतराने विज्ञान भारती आयोजित स्मार्टसिटी कार्यक्रमाच्या आयोजनात आणि कोकण प्रांताच्या कार्यकारिणीत सह-कार्यवाह पदाची जबाबदारी दिली गेली. जयंतजींना म्हटलं, 'अहो, मी साधा विज्ञानाचा विद्यार्थी सुद्धा नाही, माझ्याकडे का ही जबाबदारी

दिली आहे!' त्यावर त्यांचे उत्तर होते, 'संघात सांगितलेलं करायचं असतं, त्यावर चर्चा नाही करायची.' कालांतराने व्यक्तिगत अडचणींमुळे जबाबदारी पार न पाडल्याची खंत त्यांच्याकडे बोलल्यावर म्हणाले, 'Just Wait and Watch.'

जयंतराव जेव्हा जेव्हा पितृछाया कार्यालयात येत तेव्हा आवर्जून त्यांचा फोन असायचा. बेकरीतील काही ताजे पदार्थ त्यांना खायला आवडतात हे जाणलं होतं. तेथील चौकाच्या शेजारी असलेल्या एका हॉटेलात अनेक वेळा जाणं झालं. त्यांच्याशी सुरू झालेल्या गप्पा कधीही संपू नयेत असंच वाटायचं. कोणताही विज्ञान किंवा अन्य देखील विषय आणि त्याची सविस्तर माहिती त्यांच्याकडे नाही, असं कधीच अनुभवायला मिळालं नाही. इतक्या सुसूत्रतेत ते माहिती सांगायचं की, अगदी मंत्रमुग्ध व्हायला व्हायचं. मग स्वामी विवेकानंदांचे संगीतातले सखोल ज्ञान असेल की टेक्स्ला च्या तंत्रज्ञानाची माहिती असेल.... इतका परिपूर्ण माहितीचा साठा एकावेळी कसं काय ते डोक्यात साठवून ठेवतात याचं कौतुक असायचं. बिनधास्त विचारलं सुद्धा, त्यावेळी त्यांनी आवर्तन ध्यानाची आठवण करून दिली. म्हणाले आपल्या मेंदूला एका विशिष्ट प्रकारे प्रशिक्षित केलं की, कोणतीही गोष्ट लक्षात ठेवणे फार काही कठीण नसतं. त्या एकाग्रततेच्या माध्यमातून अभ्यास आणि सराव केल्यावर कालांतराने आपसूक होऊन जाते. जयंतरावांच्या अजून कितीतरी सहज आठवणी कळत-नकळत मनात साठविल्या गेल्यात. विशेषतः त्यांच्या स्वभावाने कितीतरी माणसं लोहचुंबकासारखी जोडली गेली.

त्यांना राग येत नव्हता असं नाही बरं का ! त्यांनी एकदा अभ्यासपूर्ण सांगितलेल्या कामात जेव्हा कोणी स्वतःच्या मनाने बदल केला, तर त्यांचे रौद्र रूप सुद्धा पहायला मिळाले आहे. एका बातमीच्या बाबतीत त्यांनी सूचना दिल्या होत्या की, कशाप्रकारे त्या एका कार्यक्रमाची माहिती छापून येणे गरजेचे आहे. त्यांचा तसाच्या तसा निरोप मी आमच्या पत्रकार मित्रापर्यंत पोहचवला. पण तो पत्रकार मित्र सुद्धा विज्ञान क्षेत्रातील असल्याने, त्याने त्या बातमीत काही बदल स्वतःच्या मनाने केले आणि मला जयंतरावांचा तो राग अनुभवण्याची संधी मिळाली होती. अशा संधी सुद्धा भाग्यवंतांनाच मिळतात. नंतर त्यांनी शांतपणे समजावून सुद्धा सांगितले तेव्हा वस्तुस्थिती सांगितल्यावर त्यांनी मला समजून घेतले.

जयंतरावांची शाबासकी मिळालेली एक घटना आठवते.. चार एक वर्षांपूर्वी नागपूरला विज्ञान भारतीचे अखिल भारतीय अधिवेशन झाले होते. आम्ही मुंबईचे काही कार्यकर्ते सहभागी झालो होतो. मुंबईकरांनी एक छोटासा पुस्तकांचा स्टॉल लावला होता. त्यात आकर्षणाचा बिंदू ठरलेले पुस्तक Ancient Science of INDA हातोहात विक्री झाले. दुसऱ्या दिवशी विक्रीस एकही पुस्तक उरले नव्हतं. काही वरीष्ठ मंडळी म्हणाली की, तुम्हाला आधीच सांगितले होते की, जास्तीची पुस्तके घ्या, पाहिलं न आत्ता ! मागणी आहे पण पुस्तक नाहीत. अशी स्थिती होती. पालेकरांच्या मी कानात सांगितलं, जर उद्या पुस्तक हवी असतील तर सकाळी साधारण १० वाजेपर्यंत नागपूरला पोहचतील. पालेकरांनी विचारलं, कसं काय? विमानान. पण इतक्या लवकर शक्य नाही. मी म्हणालो, तुम्हाला काय करायचंय ते, पोहचली म्हणजे झालं नं. तुम्ही फक्त पितृछायामधून कोणाला तरी दादर स्थानकावर पोहोचवायला सांगा, बाकी मी पाहतो. त्यांना साधारण कल्पना सांगितली, त्यांनी विश्वास ठेवला आणि तशी व्यवस्था केली. दरम्यान रात्री अविनाशला फोन करून माझी कल्पना सांगितली होती. त्याने त्याचे तंतोतंत पालन केले. रात्री छत्रपती शिवाजी टर्मिनसहून दूरांतो एक्सप्रेस सुटते. त्या गाडीच्या पेंट्री मधील अमुक एका व्यक्तीला तो पुस्तकांचा गठ्ठा दे, आणि त्यांना माझा मोबाईल क्रमांक पण दे.

दूरांतो १२ तासात कोठेही न थांबता नागपूरला पोहचते माहीत होतं, आम्ही त्याच गाडीने आलो होतो. ओळख काढून पेंट्री मधील एका व्यक्तीशी बोलणं केलं, त्याच व्यक्तीकडे अविनाशला पुस्तक द्यायला सांगितली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही दोघे नागपूर रेल्वे स्टेशनला पोहचलो आणि पुस्तकांचा गठ्ठा ताब्यात घेतला. सकाळी स्टॉल लागण्याच्या वेळेत मुबलक पुस्तकं उपलब्ध होती! सर्वांना आनंद झाला. जयंतरावांना ही घटना कळल्यावर, त्यांच्या भुवया उंचावून स्मितहास्य देण्याच्या स्टाईल सोबत, पाठीवर कौतुकाची थाप मारत म्हणाले, 'कल्पना, इच्छाशक्ती आणि उपलब्ध साधनांची जोड यांची समीकरणं जुळविल्यास असाधारण गोष्टी देखील सहज साध्य करता येतात, असे अनेक INNOVATORS सर्वसामान्यांत सुद्धा असतात.'

पुढे म्हणाले.....

अमंत् अक्षरं नास्ति:<br>
नास्ति मुलं अनौषधम् !<br>
अयोग्य: पुरुषो नास्ति:<br>
योजकस्त्र दुर्लभ:!

जयंतरावांनी अनेकांना असे प्रोत्साहन देता देता, सहज कामात सामावून घेतले होते.

काही वेळा महत्त्वाच्या कामानिमित्त, हातातली कमी महत्त्वाची कामं सोडून जाण्याचा प्रसंग आला. जयंतराव म्हणाले, जेथे असशील तेथून तातडीने निघून ये. प्रतिप्रश्न न करता गेलो आणि जे सांगितले ते काम पूर्ण केले, पण दरम्यानच्या एका मीटिंगमध्ये जाण्यास उशीर होईल असे एका सहकाऱ्याला सांगितले होते. पण दुसऱ्या सहकाऱ्याने मुद्दामहून घातलेला गोंधळ आणि त्यामुळे अस्वस्थ झालेले मन जयंतजींकडे मोकळे करताना ते म्हणाले, हे बघ, समाज आणि संघ हे काही वेगळे नाही. समाजातील व्यक्तिमत्त्व ही संघात सुद्धा आहेतच. त्यामुळे अशांकडे दुर्लक्ष करण्याची कला आपण अवगत केली पाहिजे. त्यांना समजावणे किंवा बदलणे हे कदापि आपल्या हातात नाही, म्हणून उगाच अस्वस्थ होण्यापेक्षा अशांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केल्यास त्रास होत नाही. मी नि:शद्ब होतो! दुर्लक्ष कला कशी शिकायची त्याकडे मनाला समजावत होतो.

काही महिन्यांपूर्वी जेव्हा त्यांच्या गंभीर अपघाताची बातमी कानावर आली, आणि त्या अपघाताची गांभीर्यता विस्तृत ऐकल्यावर मन राहून न राहून विषण्ण व्हायचं. कधी एकदा पुन्हा त्या दादरच्या बेकरीत जयंतरावांसोबत जाण्यास आसुसलं होतं.

घरी आल्यावर तर अगदी जमिनीवर बसून घट्ट बालमित्रासारखे सोबत जेवणारे जयंतराव, -

आता तुम्ही कोणात, कधी, कोठे दिसाल?

**– दयानंद सावंत**<br>
ज्येष्ठ अभ्यासक, विज्ञान भारती, मुंबई<br>
भ्रमणध्वनी ९८६९६ १९७०४

●●●

## गणपतीला पाहताना आपल्याला जाणवेल

**मोठे डोके** : मोठे विचार करण्यासाठी

**छोटे डोळे** : एकाग्रतेसाठी

**मोठे कान** : जास्त ऐकण्यासाठी

**लहान तोंड** : कमी बोलण्यासाठी

**मोठे पोट** : सुख आणि दु:ख पचविण्यासाठी

**आशीर्वाद** : यशस्वी होऊन आध्यात्मिक प्रगतीसाठी

**शस्त्र** : दुष्ट शक्तींच्या विनाशासाठी

**मोदक** : साधनेचे फलित


**उंदीर** : मोहाचं प्रतीक, मोहावर आरूढ होऊन विजय मिळविण्यासाठी.

**– संग्रहातून**

चांगल्या-वाईट गोष्टीचा कल तुमचे मन प्रामाणिकपणे देत असतं, मनाचे चांगले मार्गदर्शक घ्यावे.

# स्वातंत्र्यवीर सावरकर : परिचित, अपरिचित : पुस्तक परिचय

*अक्षय जोग यांनी लिहिलेल्या सावरकरांवरील एका वेगळ्या पुस्तकाचे पुस्तक परीक्षण ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ चंद्रशेखर टिळक यांनी प्रस्तुत लेखात केले आहे : संपादक*




स्वातंत्र्योत्तर भारतात सदैव वादग्रस्त ठरलेले किंवा ठरवले गेलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर. अर्थातच ही काही त्यांची एकमेव ओळख नाही.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनंत पैलू होते किंवा आहेत याबद्दल कोणतेही दुमत व्हायचे कारण नाही.

त्यांचे प्रत्येक मत किंवा कृती प्रत्येकाला दरवेळी मान्य असेलच असे नाही. तसे असण्याची लोकशाही व्यवस्थेत अत्यावश्यकता काय, आवश्यकता सुद्धा नाही.

पण आधी ते नेमके काय म्हणाले, कसे वागले हे तर माहीत असायला हवे.

म्हणतात ना ... प्रत्यक्ष कृती करणाऱ्या माणसापेक्षा त्या कृती / उक्तीचे नंतर विच्छेदन ( पोस्ट - मोर्टेम ) करणाऱ्याला जास्त वेळ आणि माहिती असते.

आणि त्यामुळे तुमच्या - माझ्यासारख्या सर्वसामान्य वाचकांनी तरी अशा गोष्टींबाबत मिळेल ती माहिती आधी निर्लेपपणे वाचून त्यावर विचार केला पाहिजे.

माहिती ... परिचित आणि अपरिचितही !

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी सखोल अभ्यास करत अशी माहिती गोळा करून समोर आणण्याचे काम सातत्याने करणारे सध्याचे आघाडीचे नाव म्हणजे अक्षय जोग ... लेखक म्हणून आणि वक्ता म्हणूनही.

प्रचलित राजकीय गदारोळात उठणाऱ्या मुद्यांपुरेसा अभ्यास मर्यादीत न ठेवता एकंदरीतच प्रतिपाद्य अभ्यास - विषयाचा विविधांगी विचार म्हणजे अक्षय जोग आणि त्यांचे स्वातंत्र्यवीर सावरकर : परिचित - अपरिचित हे पुस्तक.

८८ पानात ११ प्रकरणांच्या माध्यमातून

...१८५७ चे स्वातंत्र्यसमर ग्रंथाचा रोमहर्षक प्रवास

.... काश्मीर

.... साध्यानुकुल सहकार्य धोरण

.... सावरकर बंधू आणि काँग्रेस

.... पंचशताधिक्म ( सावरकर आणि गांधी )

.... गांधींचे नाव... वाटचाल सावरकरवादाकडे

.... सावरकर व स्वदेशी

.... सावरकर आणि भगतसिंग

... सावरकर आणि चीन

... सावरकर, टिळक, क्रांतिकारकांचे जाळे

खरे ज्ञान हे सुंदर असते, ते प्रसन्न असते, ते सुखद असते. आनंदाचे किरण आसमंतात पसरविणारे असते.

असे वेगवेगळे विषय, अगदी त्यांच्या संदर्भ साहित्य सूची सहीत या पुस्तकात आहेत.

त्यातून स्वातंत्र्यवीर सावरकर या शतपैलू, बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे काही पैलू नव्याने समजतात. त्यांच्याविषयीची एरवी विखुरलेल्या स्वरूपात असणारी दुर्मीळ माहिती या पुस्तकात आपल्याला वाचक म्हणून मिळते ... काही ठिकाणी लेखक म्हणून अक्षय जोग यांनी केलेल्या टिप्पणीं सहीत.

व्यक्ती, तिचे विचार, त्या त्या वक्तव्याचे तत्कालीन संदर्भ असा विचार करत सावरकरांचे गांधी, नेहरू, टिळक, काश्मीर, आणि अगदी चीन सुद्धा, याबाबत असणारे विचार जरूर वाचण्यास उद्युक्त करतील असेच आहेत.

टिळक आणि क्रांतिकारक याबाबतीत लोकमान्य टिळक या विषयावरील माझ्या तीन दिवसीय व्याख्यानमालेत मी जे मुद्दे सविस्तरपणे मांडतो ते इथे संक्षिप्त स्वरूपात येतात हा भाग तर मला व्यक्तिशः सुखावणाराच असतो.

हे पुस्तक काल परत वाचत असताना पुन्हा एकदा माझ्या मनात असे विचार येत होते की, महाराष्ट्रातील स्वातंत्र्ययोद्ध्यांनी जितका परतंत्र, तसेच स्वतंत्र भारतासाठी त्यावेळी जितका आर्थिक आणि परराष्ट्रीय धोरणाचा विचार आणि प्रसंगी कृतीही केली आहे, तितका विचार इतर राज्यातील तत्कालीन नेत्यांनी केलेला आहे का?

माझ्या मनाने दिलेले उत्तर नकारार्थी आहे.

आणि हे जर खरे असेल तर आज राष्ट्रीय धोरण – निर्मिती आणि अंमलबजावणी यात आपला महाराष्ट्र कुठे आहे ?

Information must preceed Its interpretation याची वारंवार आठवण करून देणारे असे पुस्तक आहे हे निश्चित !

एखाद्या मुद्याविषयी, एखाद्या व्यक्तीविषयी कोणतीही भूमिका ठरवताना आधी विचार तर करू ... हे पुस्तक असे विचार करायला भाग पाडते हे नक्की !

'आदरणीय असणे' आणि 'अनुकरणीय असणे' या दोन गोष्टी वेगवेगळ्या असतात आणि अनेकदा त्या स्थिती – सापेक्ष असतात. हे जितके राजकारणात खरे असते तितकेच ते अलीकडच्या काळात सामाजिक – सांस्कृतिक वातावरणातही खरे असते का असा प्रश्न, काही प्रमाणात तरी, निष्पक्ष वाचकाच्या मनात उभे करणारे पुस्तक म्हणजे मोरया प्रकाशनाने प्रसिद्ध केलेले, अक्षय जोग लिखित 'स्वातंत्र्यवीर सावरकर : परिचित अपरिचित' हे पुस्तक.

एक जरा वेगळा मुद्दा ...

हे पुस्तक वाचत असताना मनात उगाचच आले की, सामाजिक जीवनात एका वेगळ्या पातळीवर सातत्य आणि हटवादीपणा यातली विभाजन रेषा अस्पष्ट असते किंवा होत राहते का?

सध्या पुस्तकाची पाचवी आवृत्ती उपलब्ध आहे. पुस्तक खरेदीची ऑनलाईन link - https://morayaprakashan.com/product/swatantrya-veer-savarkar-parichit-aparichit/

पुस्तकाचे नाव : स्वातंत्र्यवीर सावरकर : परिचित – अपरिचित

लेखक : अक्षय जोग, प्रकाशक : मोरया प्रकाशन भाषा : मराठी, किंमत : १५० रुपये, पृष्ठ संख्या : ८८

**– चन्द्रशेखर टिळक**
ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ
सी–४०२, राज पार्क, मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व), पिन – ४२१२०१
भ्रमणध्वनी – ९८२०२९२३७६

●●●

# श्रीपाद वल्लभ दिगंबरा...

*कलियुगातील दत्तात्रेयांचा प्रथम अवतार मानले गेलेले श्री श्रीपाद वल्लभ यांच्याविषयी माहिती देणारा लेख - संपादक*

श्रीपाद श्रीवल्लभ यांनी आपल्या माता-पित्यांना आपण दत्तात्रेयांचा अवतार असल्याचा दृष्टांत देऊन ते भारतवर्षात अतिशय पवित्र मानल्या गेलेल्या काशीक्षेत्रास गेले. काशी या पवित्र स्थळाविषयी प्रत्येक श्रद्धाळू हिंदू व्यक्तीला माहिती असतेच, परंतु त्याची जीवनात एकदा तरी येथे जाण्याची इच्छा असते. याचे कारण म्हणजे काशी हे शहर भारताच्याच नव्हे तर मानवाच्या इतिहासातील अति प्राचीन शहरांपैकी एक आहे. तसेच या शहराचा उल्लेख प्राचीन हिंदू धर्मसाहित्यात सतत आला असल्याचे आपल्या निदर्शनास येते. या ठिकाणी साक्षात भगवान शिवाचा कायमस्वरूपी निवास असल्याचे हिंदू मानतात. काशी क्षेत्री येऊन गंगेत स्नान केल्यानंतर पापक्षालन होते अशी हिंदू धर्मीयांमध्ये श्रद्धा आहे. प्रलय आल्यानंतर संपूर्ण सृष्टीचा नाश झाला तरी काशी या पवित्रस्थळाला काहीही होत नाही. कारण भगवान शिव काशीला आपल्या त्रिशूलावर उचलून धरतात असे हिंदू मानतात. तर अशा या भगवान शिवाच्या पवित्र भूमीत श्रीपाद वल्लभांनी काही काळ व्यतीत केला.

काशीनंतर ते हरिद्वारला गेले. हरिद्वार येथे कुंभमेळा भरत असतो. कुंभमेळ्याचे हिंदू धर्मात अनन्यसाधारण महत्त्व आहे. कुंभमेळ्यातील स्नान अतिशय पवित्र मानले जाते. नाशिक, उज्जैन व प्रयागराज - अलाहाबाद येथे कुंभमेळा भरत असतो. दर चार वर्षांनंतर कुंभमेळा या चारपैकी एका ठिकाणी भरत असतो. त्यामुळे ज्या ठिकाणी कुंभमेळा भरला असेल तेथे बारा वर्षांनंतरच कुंभमेळा भरतो. कारण पुढील प्रत्येकी चार वर्षांनंतर तो उरलेल्या तीन ठिकाणी क्रमाक्रमाने भरत असतो. हरिद्वार व प्रयाग येथे भाविक व विविध पंथीय साधू गंगेत स्नान करतात तर उज्जैन व नाशिक येथे क्रमशः शिप्रा व गोदावरी नदीत पवित्र स्नान केले जाते. असो. तर आपला मूळ मुद्दा असा होता की, श्रीपाद वल्लभ भक्तीमय वातावरणाने भारून टाकलेल्या काशी व हरिद्वार क्षेत्री गेले. तद्नंतर ते बद्रीनाथ व केदारनाथ येथे गेले. बद्रीनाथ हे भगवान विष्णूंचे स्थान म्हणून ओळखले जाते, तर केदारनाथ येथे भगवान शिवाचा वास असतो. श्रीपाद वल्लभ जगन्नाथपुरीला सुद्धा गेले होते. जगन्नाथपुरी हे धर्मक्षेत्र ओडिशा या भारतातील पूर्वेकडील राज्यात असून, येथे जगभरातील भाविक हिंदू भगवान विष्णूचे दर्शन घेण्यासाठी जातात. त्याचप्रमाणे जगन्नाथपुरी हे हिंदूंच्या चारधाम यात्रेतील एक धाम आहे. श्रद्धाळू हिंदूंची अशी इच्छा असते की, आपण जीवनात एकदा तरी काशीला जावे. त्याचप्रमाणे अनेकांची इच्छा बद्रीनाथ, द्वारका, जगन्नाथपुरी व रामेश्वरम्‌ला जाऊन चारधाम यात्रा करावी. द्वारकेविषयी सांगावयाचे झाले तर, महाभारताच्या युद्धानंतर भगवान श्रीकृष्ण येथे येऊन राहिले. रामेश्वरम्‌चे महत्त्व असे की, रामायणाप्रमाणे भगवान श्रीराम येथूनच सीतामातेची रावणाच्या बंदीतून सुटका करण्यासाठी लंकेला गेले. रावणाबरोबर तुंबळ युद्ध करून भगवान श्रीराम त्याचा पराभव करून वध करतात व सीतामातेस सन्मानाने अयोध्येला घेऊन जातात. लंकेला जाण्यासाठी सेतू बांधण्यापूर्वी ते रामेश्वरम्‌ला वाळूचे शिवलिंग बनवून भगवान शिवाची आराधना करतात अशी कथा आपणास वाचावयास मिळते.

श्रीपाद वल्लभ कर्नाटकातील गोकर्ण येथे देखील गेल्याचे आपणास दत्तगुरूंशी संबंधित साहित्यात

वाचावयास मिळते. या ठिकाणाविषयीची आख्यायिका अशी आहे की, रावण शिवलिंग घेऊन जात असताना येथे थांबला व त्याने ते शिवलिंग गुराख्याच्या वेषात आलेल्या गणपती जवळ दिले व गणेशाने ते शिवलिंग आपले बुद्धीचातुर्य दाखवून जमीनीवर ठेवले. रावण साक्षात महादेवाने दिलेले शिवलिंग कैलासावरून लंकेला घेऊन जात होता. रावणाला एक अट घातलेली असते की, 'त्याने लंकेला परत जात असताना मार्गात हे शिवलिंग कुठेही जमीनीवर ठेवू नये. त्याने ते जर जमीनीवर ठेवले तर ते त्याच ठिकाणी लुप्त होईल' असे रावणास सांगितलेले असते. त्यामुळे जेव्हा गणपती शिवलिंग खाली ठेवतो तेव्हा ते जमीनीत जाते. रावणाने आपली पूर्ण शक्ती लावून देखील ते बाहेर येत नाही. रावण हा बलवान व शूर होता. त्याच्यासारख्या महाबलशालीला ते शिवलिंग बाहेर काढता आले नाही म्हणून या ठिकाणाला 'महाबळेश्वर गोकर्ण' असे म्हणतात. गोकर्ण म्हणजे गायीचा कान. रावणाने शिवलिंग बाहेर ओढून काढण्याचा प्रयत्न करताना या ठिकाणाचा आकार गायीच्या कानाच्या आकाराचा झाला. त्यामुळे गोकर्ण असे म्हणतात.

श्रीपाद श्रीवल्लभ श्री शैलम्‌ला देखील गेले. हे आंध्र प्रदेशातील भगवान शिवाशी संबंधित महत्त्वाचे पवित्रस्थान आहे. श्रीपाद वल्लभ यांनी सध्याच्या कर्नाटक राज्यातील कुरवपूर भूमीस सुद्धा आपल्या पुनीत पावलांनी पावन केले. कुरवपूर कर्नाटक व तेलंगणा या दोन राज्यांच्या सीमेवर आहे. कुरवपूर हे ठिकाण स्वातंत्र्या-पूर्वीच्या दक्षिणेतील निझामाच्या हैदराबाद या संस्थानात होते. येथे कृष्णा नदीचे दोन भाग होतात व पुढे जाऊन काही अंतरावर हे दोन प्रवाह एकत्र होतात. कृष्णा नदीचे जेथे दोन प्रवाह होतात तेथील बेटाला 'कुरगुड्डी बेट' म्हटले जाते. श्रीपाद वल्लभ येथेच ध्यान व तप करत असत असे भक्तगण मानतात. तसेच येथील औदुंबर वृक्षाखाली ते बसत असत. श्रीपाद वल्लभ येथे माधुकरी मागून आपला उदरनिर्वाह करत असत. कुरवपूर बेटावर श्रीपाद मंदिर आहे. या मंदिरात केशवाची व हनुमानाची मूर्ती आहे व शिवलिंग पादुका आहेत. येथे श्रीपाद वल्लभ तप व अनुष्ठान करत असत.

असे म्हणतात की, कुरवपूरला टेंबेस्वामींनी १९१० च्या आसपास एका गुहेत चार्तुमास केला होता. याठिकाणी आता एक शिवमंदिर आहे. टेंबेस्वामी हे वासुदेवानंद सरस्वती या नावाने देखील प्रसिद्ध आहेत. दत्तपरंपरेत त्यांनी लिखाणाच्या स्वरूपात मोठे योगदान दिले आहे. दत्तगुरूंचे भक्त टेंबेस्वामींना दत्तात्रेयांचा अवतार मानतात.

येथील वटवृक्षाखाली भक्तगणांनी श्रीपाद स्वामींच्या पादुकांची स्थापना केली आहे. वटवृक्षाप्रमाणेच येथे औदुंबर वृक्ष देखील आहे. टेंबेस्वामीं प्रमाणेच येथे श्रीधरस्वामी, गुळवणी महाराज, पोखरापूर महाराज आदी प्रभृति येथे येऊन गेलेल्या आहेत. कुरवपूरचा एकूणच परिसर अतिशय सुंदर, शांत व नयनरम्य आहे. ज्यांची मनापासून एकाग्र चित्ताने दत्तगुरूंची आराधना, ध्यानधारणा व चिंतन करण्याची इच्छा आहे त्यांनी कुरवपूरला नक्की भेट द्यावी. कुरवपूरला जाऊन आलेल्यांचा अनुभव असा आहे की, येथे श्रीपाद श्रीवल्लभांची अनुभूती येते. त्यांचा येथे गुप्त रूपाने वास असतो व ते आपल्या भक्तांचे रक्षण करतात अशी धारणा आहे.

दत्तसंप्रदायी असे मानतात की, श्रीपाद श्रीवल्लभांनी पुढील जन्मी नृसिंह सरस्वती या नावाने अवतार घेतला. यामागची कथा अशी की, कुरवपूर येथे अंबिका नावाची एक ब्राह्मण विधवा व तिचा मुलगा कृष्णानदीत उडी घेऊन आत्महत्या करण्याच्या तयारीत होते. तेव्हा त्यांना तेथे श्रीपाद श्रीवल्लभ दिसले व त्या मायलेकरांनी श्रीपाद स्वामींचा आशीर्वाद मागितला जेणेकरून त्यांना आत्महत्येच्या पापातून मुक्ती मिळेल. आत्महत्येचे कारण असे होते की, अंबिकेचा मुलगा मूढ होता. त्याच्या या मंद व मूर्खपणामुळे त्यांची एकप्रकारे टिंगलटवाळी व

मानहानी होत असे. त्यामुळे त्यांनी आत्महत्या करून आपला जीवनप्रवास संपविण्याचे ठरविले होते. श्रीपाद श्रीवल्लभांनी अंबिकेला आपल्या मनीच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी शनीप्रदोष व्रत करण्यास सांगितले. येथे प्रदोष या व्रताविषयी माहिती देणे सयुक्तिक ठरेल. प्रदोष हे व्रत भगवान शिवाच्या पूजेशी संबंधित आहे. सूर्योदयापूर्वीचा व सूर्योदयानंतरचा एक-दीड तासाचा काळ हा प्रदोषकाळ म्हणून ओळखला जातो. भक्तगण या दिवशी उपवास करून भगवान शिवाची पूजा करतात. हे व्रत केल्यामुळे मनीच्या इच्छा पूर्ण होतात व पुण्य प्राप्त होते असे म्हणतात. एकादशीच्या नंतरच्या दुसऱ्या दिवशी प्रदोषकाळ तिथी असते व ही महिन्यातून साधारणपणे दोन दिवस येते. आठवड्यातील विविध दिवशी आलेल्या प्रदोषाचे वेगळे व विशेष महत्त्व आहे. रविवारी प्रदोष व्रत केल्यास आरोग्य उत्तम राहते. सोमवार प्रदोष व्रत मनातील इच्छा पूर्ण करते. मंगळवार प्रदोष व्रत केल्यावर चांगले स्वास्थ्य व समृद्धी प्राप्त होते. बुधवार प्रदोष व्रत कार्यसिद्धी होण्यास मदत करते. गुरुवार प्रदोष व्रत आपल्या शत्रूंचा नाश करते. शुक्रवार प्रदोष सौभाग्यवतींना फलदायक आहे. या व्रतामुळे सौभाग्याची वृद्धी होते. महिन्यातील शुद्ध वा वद्य त्रयोदशी शनिवारी आल्यास शनीप्रदोष असतो. शनीप्रदोष व्रतामुळे मनातील इच्छा तर पूर्ण होतातच व पुत्रप्राप्ती देखील होते. असे मानले जाते की, शनीप्रदोष व्रतामुळे राहू तसेच शनी पीडेपासून व संकटांपासून मुक्ती मिळते. दत्तसंप्रदायात शनीप्रदोष व्रतास फार महत्त्व आहे. याची महती गुरुचरित्रात वर्णिलेली आहे. तसेच पीठापूरला शनीप्रदोषाच्या दिवशीच श्रीपादवल्लभांच्या पादुकांचा अभिषेक केला जातो. अंबिकेच्या दोन इच्छा होत्या. एक तर तिचा मूढ मुलगा ज्ञानी व्हावा व दुसऱ्या जन्मी तिला श्रीपाद वल्लभांसारखा पुत्र प्राप्त व्हावा. तिच्या या दोन्ही इच्छा श्रीपाद श्रीवल्लभांनी पूर्ण केल्या. तिचा हा मूढ मुलगा ज्ञानी झाला व दुसऱ्या जन्मी श्रीपाद वल्लभ तिच्या पोटी नृसिंह सरस्वती यांच्या रूपाने जन्माला आले.

**संदर्भग्रंथ**


- श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रांमृत: मूळ लेखक - श्री शंकर भट, अनुवाद - श्री हरीभाऊ निटूरकर (भाऊ महाराज)
- श्रीदत्त परिक्रमा: प्रा. क्षितिज पाटुकले
- श्री गुरुचरित्र कथामृत: संपादक - कृष्णभक्त दिवाकर अनंत घैसास
- दत्तात्रय व इम्मॉर्टल गुरू, तोंडीं, अँड अवतार अ स्टडी ऑफ व ट्रान्सफॉर्मेटिव अॅन्ड इन्क्लूसिव कॅरॅक्टर ऑफ अ मल्टी-फॅसेटेड हिंदू डेयिटी - अँटेनियो रिगोपूलस
- अक्कलकोट श्रीस्वामी समर्थ महाराजांची आद्य बखर - विवेक दिगंबर वैद्य (संशोधन व संपादन)
- दारिद्र्य, दु:ख, संकटनाशक श्रीदत्त उपासना - प्रिया मालवणकर
- कर्दळीवन एक अनुभूती - प्रा. क्षितिज पाटुकले
- श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत - मूळ ग्रंथरचना - श्री शंकर भट- अनुवाद- श्री हरिभाऊ जोशी निटूरकर
- श्री अक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थ चरित्र व कार्य - श्रीपादशास्त्री किंजवडेकर
- स्वामींची दिव्यानुभूती - प्रा. डॉ. यशवंतराव पाटील
- पुण्यभूमी नृसिंहवाडी: डॉ. बाळकृष्ण महादेव जमदग्नी व डॉ. सौ. मृणालिनी बाळकृष्ण जमदग्नी



**- सहा. प्राध्यापक सुभाष गंगाराम शिंदे**

उपप्राचार्य व इतिहास विभागप्रमुख

विप्रमंचे जोशी-बेडेकर (स्वायत्त), महाविद्यालय,

ठाणे (पश्चिम)-४००६०६

भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६

Email : narendra.v.gole@gmail.com


●●●

# पुरोगामिनी सावित्री

*'वट सावित्री' कथेची वेगळी मांडणी करणारी कथा. - संपादक*

एक होता राजा. अश्वपती त्याचं नाव.

काळ? महाभारताच्या पूर्वीचा.

राज्य? मद्र देश. म्हणजे सध्याचं जम्मू काश्मीर.

या प्रदेशाला 'भारताचं मस्तक' उगीच नाही म्हटलं जात. कश्यप ऋषींच्या तपश्चर्येची ही भूमी. पांडित्याची परंपरा असलेला प्रदेश. देशभरातून साधक, तत्त्वचिंतक या प्रदेशात आले आणि हिमालयाच्या विशाल, प्रशांत पार्श्वभूमीवर त्यांनी जीवनविषयक चिंतन केले, सिद्धांत मांडले. ज्ञान, विज्ञान, कला, साहित्य इथे बहरले.

आदि शंकराचार्यांपासून स्वामी विवेकानंदांपर्यंत थोर विभूतींनी इथे चिंतन केले. त्या काळातील ज्ञानाच्या परंपरेला साजेसा राजा अश्वपती. वैयक्तिक सुखापेक्षा समाज, लोकहित याला प्राधान्य देणारा. राज्याच्या वैभवाला, सुख समृद्धीला आधार होता ते मद्र प्रदेशातील विख्यात, सुलक्षणी, ताकदवान अश्वांचा. मद्र देश उत्तम व प्रशिक्षित अश्व अन्य राज्यांना युद्धाकरता पुरवत असे. या वैभवाला कोंदण होते ते सत्शील व धर्मपरायण अश्वपतीच्या पराक्रमाचे.

पण राजा होता निपुत्रिक. त्या काळच्या पद्धतीनुसार म्हणा किंवा त्या परिभाषेनुसार म्हणा, त्यानं पुत्रकामेष्टी यज्ञ करायचं ठरवलं. इथे आपण कुचेष्टेने हसतो ! यज्ञाने का कुठे मुलं होतात, म्हणून.

पण यज्ञ म्हणजे तरी काय ? एखादे ध्येय साध्य करण्या करता केलेली प्रयत्नांची पराकाष्ठा. दिवसरात्र त्या ध्येयाचा ध्यास आणि त्या करता शक्य ते सर्व करणे. आहुती द्यायची आपल्या कष्टांची, त्या ध्येयप्राप्तीकरता त्या गाव्या लागणाऱ्या सुखांची. मन एकाग्र करायचं त्या एकाच विचारावर, आणि त्या करता मदत घ्यायची एखाद्या मंत्राची. मानवी प्रयत्न अपुरे असतात याची नम्र जाणीव ठेवून विश्वातल्या चैतन्याला आवाहन करायचं.

अश्वपतीने तेच केलं. विश्वातील शाश्वत सत्य म्हणजे सूर्य. त्याची आराधना करायची. त्याकरता त्यानं गायत्री मंत्राचं अनुष्ठान मांडलं. दररोज एक लाख मंत्र जपायचा. आता हे एकट्यानं शक्य आहे का? तर नाही. पण त्या करता त्यानं अन्य सत्प्रवृत्त लोकांची मदत घेतली. राजा स्वतः कठोर बंधने पाळत असे. तीन दिवसांतून एकदा अन्न ग्रहण करे. असं किती काळ? अठरा वर्षं केलं. राजाचं देहबल, मनोबल, तपोबल आणि इच्छाबळ किती वाढलं असेल!

अखेर या साधनेचं फळ मिळायची वेळ आली. त्याला विश्वमाता प्रसन्न झाली. पण ती म्हणाली, 'तुझ्या भाग्यात ब्रह्मदेवानं पुत्रयोग लिहिलेला नाही. तुला कन्या होऊ शकते.' अश्वपती म्हणाला, 'तर मग तूच माझ्या पोटी जन्माला ये.' राजाचं अजून एक वेगळेपण हे की, त्याला अशा संतानाची इच्छा होती जो मानववंशाला सत्याचा मार्ग दाखवेल. तो दिव्य संतान मागत होता ते विश्वकल्याणाची कामना धरून. आणि मग अशा कठोर प्रयत्नांच्या आणि विशाल हेतूच्या पोटी जन्मली सावित्री! तिला जन्म दिला अश्वपतीची देखणी आणि समंजस राणी मालवी हिनं. राजा-राणीनं तिला अत्यंत मुक्त,

निर्भर वातावरणात वाढवली. तिचं उपनयन करून तिला गुरुगृही पाठवली. तिला सर्व प्रकारच्या विद्या, कला यात पारंगत केली. अत्यंत देखणी, अतिशय बुद्धिमान, कलासक्त, विलक्षण तेजस्वी, मनस्वी अशी ही कन्या. हिचं बुद्धिवैभव आणि स्वतंत्र विचार पेलणारा कुणी युवक राजाला मिळेना. तिच्या विवाहाची चिंता त्याला लागली..

राजानं एक अतिशय धाडसी पाऊल उचललं. सावित्रीला एक सुसज्ज रथ दिला आणि सांगितलं की, 'जा, आणि तुला सुयोग्य असा पती तूच शोध.' सावित्री निघाली. किती सुंदर असेल तिचा हा प्रवास! हे काही पर्यटन नव्हते. राजाने विचारपूर्वक दिलेले स्वातंत्र्य, दिलेली संधी होती. सावित्रीच्या वर-संशोधना आधी तिला या प्रवासात आत्मशोध घ्यायचा होता. आपण कोण आहोत, जगात काय चालू आहे, आपल्याला भावी आयुष्यात काय साध्य करायचं आहे आणि त्या करता आपल्याला कसा जोडीदार हवा याचं चिंतन तिनं केलं. ती आसपासच्या राज्यांत गेली. राजवाड्यांत गेली. तिच्या रूपानं मोहित होणारे देखणे, बलदंड; पण अहंकारी राजपुत्र तिला भेटले. तिच्या संपन्न पार्श्वभूमीवर भाळलेले आणि तिच्याकडून निव्वळ देहिक सुखाच्या अपेक्षा करणारे राजपुत्र तिनं पाहिले. काही सत्शील पण क्षात्र तेजाचा अभाव असलेले, तर काही इतके सत्त्वहीन की हिच्या दृष्टीला दृष्टीही भिडवू शकले नाहीत.

ती गावात गेली. राबणारे श्रमसाधक तिनं पाहिले, ती आश्रमांत गेली तिथे तिनं अनेक ज्ञान-साधक पहिले.. तिला आस होती ती सर्वगुणसंपन्न परिपूर्ण पुरुषाची. जो बुद्धी, बळ, ज्ञान, रूप, गुणसंपन्न असेल.. आपलं कर्तृत्व आणि पुरुषार्थ यांसह तिची स्वप्नं जपणारा, तिला समान आदर देणारा असेल.. जो जीवनाचा अर्थ जाणत असेल, या विश्वनाट्यातील आपली भूमिका समजून निसर्ग आणि भौतिक सुखाचं संतुलन करणारा असेल, जो स्पर्धा, युद्ध यापेक्षा संवाद, सहयोग यावर विश्वास ठेवणारा असेल, जो मनुष्यत्वाला, साहचर्याला, सहजीवनाला पुढच्या पायरीवर नेईल असा जोडीदार..

अश्वपतीचीच लेक ती ! प्रयत्न थोडेच सोडणार !

कुठेही असा परिपूर्ण युवक तिला भेटला नाही म्हणून ती थेट अरण्यात गेली. जिथे तिचे वनबांधव रहात, जिथल्या जटिल रानातल्या एकाकी स्थानांवर ऋषी तपश्चर्या करत, अशा वनात. तिथे तिला तो भेटला. तिच्या मनातला पुरुषोत्तम, सत्यवान. शाल्व देशाचा राजा द्युमत्सेन याचा एकुलता.. देखणा-तेजस्वी-बलदंड पण हळुवार अन् सच्च्या मनाचा. वनासारखा निर्मळ, शांत, निष्पाप. अहंकारविहीन, नम्र सौम्य बोलणारा. पढतपोपट नाही, तर अनुभवश्रीमंत असणारा. वल्कले नेसून वनातील आश्रमात आपल्या माता-पित्या सोबत रहाणारा. दोघे एकमेकांच्या प्रेमात पडले. एकमेकांशी बोलले, एकमेकांना सर्वार्थानं जाणून घेतलं, सावित्रीला सत्यवान त्याच्या आश्रमीय जीवनशैलीसह आवडला. तिनं त्याला मनोमन वरलं. दोघांनी गांधर्व विवाह केला आणि मग सावित्री परतली, आपल्या पित्याला हे सांगायला, की मला माझा जीवनसाथी मिळाला आहे.

ती आनंदाने, उत्साहाने परत आली तेव्हा अश्वपती-मालवी दोघे नारदमुनींशी बोलत बसले होते. तिचा चेहरा पाहूनच सर्वांनी काय ते ओळखले! तिनं सत्यवानाविषयी भरभरून सांगितलं. राज्यातून निष्कासित झालेला शाल्वराज द्युमत्सेन आणि शैब्या यांचा सद्गुणी पुत्र सत्यवान.. अश्वांचे जिवंत पुतळे बनवणारा सत्यवान.. देखणा व आरोग्यसंपन्न सत्यवान..

राजा-राणीने सहज नारदमुनींना विचारले की, हा युवक तुम्हाला सावित्रीच्या योग्य वाटतो का? तुम्ही याला ओळखता का? याच्यासोबत आमच्या गुणवती पण मनस्वी कन्येचा संसार सुखाचा होईल का?

नारद म्हणाले की, 'याच्यासारखा जामात तुम्हाला त्रिभुवन शोधूनही मिळणार नाही. मात्र याच्यात एकच वैगुण्य आहे ते म्हणजे याचे आयुर्मान केवळ एक वर्ष इतकेच उरले आहे.'

राजा-राणीने सावित्रीला समजावले की, याचा मोह सोड आणि पुन्हा वरसंशोधनास जा. पण सावित्री ठाम होती. ती म्हणाली, 'मी याला तन-मन अंतःकरणपूर्वक निवडला आहे. माझी बुद्धी, तर्क आणि संवेदना याच्याचकडे धाव घेत आहेत. मी आता माझा निर्णय बदलणार नाही. राहिले दैव, तर मी क्षात्रकन्या आहे. मी जीवनाशीच काय, मृत्यूशीही झुंजेन! माझ्यावर विश्वास ठेवा.'

राजा-राणीने कन्येच्या इच्छेचा मान ठेवला. तिच्यावर टाकलेला विश्वास, तिला दिलेला स्वयं-निर्णयाचा अधिकार त्यांनी काढून घेतला नाही. तातडीने वनात जाऊन तिचा विवाह सत्यावानाशी करून दिला. सावित्री वनात राहू लागली. सीतेप्रमाणे सर्व राजवस्त्रे, सुविधा, सवयी यांचा त्याग करून ती आश्रमीय जीवनात समरसून गेली. अखेर तो दिवस आला. सत्यवान सावित्री वनात गेले होते. झाडावर चढलेला सत्यवान अचानक खाली कोसळला. त्याचे प्राण न्यायला यमदेव आले. आपला प्राणप्रिय सहचर आपल्याला सोडून जात आहे हे समोर दिसत असूनही सावित्री डगमगली नाही. तिनं यमाशी संवाद केला. त्याला प्रश्न विचारले. मानवाचे प्रयत्न, त्याची अभीप्सा, त्याचं जीवनध्येय याच्याशी काही संबंध नसलेल्या यमाशी आणि आपल्या हातात मृत्यू आहे म्हणजे आपणच सर्वश्रेष्ठ या त्याच्या अहंकाराशी ती लढली.

मृत्यूपूर्वी येऊन माणसाला भ्रमित करणाऱ्या भय, अविश्वास, संभ्रम, अज्ञान, मोह या यमदूतांना तिनं ओळखलं. त्यांच्या आक्रमणामुळे तिनं आपली सकारात्मकता, जीवनेच्छा त्यागली नाही. प्रयत्न सोडले नाहीत. मनुष्याने जीवनाला योग्य रीतीनं समजून घेतलं, मृत्यूचे डावपेच ओळखून वेळीच पावलं उचलली तर मनुष्य दीर्घायुषी होऊ शकतो हे तिनं सिद्ध केलं. मन शांत ठेवून विचार केला आणि संवाद सुरू ठेवला तर समस्या सोडवता येतात हे तिनं दाखवलं.

सावित्रीची कथा भाकडकथा नाही. अश्व म्हणजे इंद्रिये. त्यांना वश केलेला राजा अश्वपती. सूर्य म्हणजे साक्षात अखंड ऊर्जा व जीवनाचे प्रतीक. त्याच्या उपासनेतून झालेली त्याची कन्या सावित्री. दृष्टी असूनही अंध झालेला व त्यामुळे राज्य गमावलेला राजा द्युमत्सेन आणि सत्याचा अविरत ध्यास घेतलेला सामान्य मानव सत्यवान. ही नावेही किती सूचक आहेत!

प्रथम इंद्रिय सुखांवर विजय मिळवा, व्यक्तिगत सुख व स्वार्थापलीकडे जाऊन विशाल अशी विश्वकल्याणाची मनीषा करा, त्याकरता समाजाचे सहकार्य घेऊन अविरत प्रयत्न करा हे 'राजा' अश्वपती सांगतो. 'पिता' अश्वपती त्याच्याही पुढे जाऊन व्यवहारात कसं वागायला हवं हे शिकवतो. पुत्राऐवजी कन्या मिळाली म्हणून निराश न होता तो तिला समर्थ बनवतो. तुझा जन्म केवळ वंशवृद्धी करता नाही तर तुला मानवी जीवनाला काही नवा अर्थ द्यायचा आहे हे तिच्या मनात रुजवतो.

डोळसपणे वाढवलेल्या तरुण, देखण्या लेकीला पूर्ण विश्वासाने प्रवासाला पाठवतो आणि वरसंशोधनात पूर्ण मोकळीक देतो. तिच्या निवडीनंतरही सत्यवान धनिक नाही, राजगृहात रहात नाही या कारणांचा उल्लेखही करत नाही. लेकीचा संसार सुखाचा व्हावा या एकमात्र अपेक्षेलाही तो त्यागतो आणि तिच्या आत्मविश्वासपूर्ण निर्णयाच्या पाठीशी उभा रहातो. राणीही आपल्या मातृसुलभ मोहाला आवरते. तिची पाठवणी करताना धनधान्य-सेवक-वस्त्रालंकार-राजवाडे-राज्य असं काहीही न देता तिचा व तिच्या कुटुंबाचा स्वाभिमान ते जपतात, तिच्या प्रयत्नवादावर पूर्ण विश्वास ठेवतात.

सावित्रीनं सत्यवानाचे प्राणच नाही तर सासरे द्युमत्सेन यांची गेलेली दृष्टी, गमावलेले राज्य परत मिळवले असे कथा सांगते. या करता सावित्रीने वर्षभर किती प्रयत्न केले असतील!

तिनं स्वतःचं ध्येय निश्चित केलं असेल. त्याकरता स्नायुबल, देहबल, मनोबल, बुद्धिबल, आत्मबल एकवटलं असेल.. कदाचित तिने वनातल्या लोकांचे सहाय्य घेतले असेल. तिथल्या ऋषी मुनींचे आशीर्वाद, त्यांचे ज्ञान याचे पाठबळ तिला मिळाले असेल. चिरंजीवित्वाचे प्रतीक असलेल्या, आपले खोड नाहीसे झाले तरी आपल्या पारंब्या मातीत घट्ट रुजवत राहिलो तर आपण अमर होतो हे तिला सांगणाऱ्या वटवृक्षाला तिनं आपलं प्रेरणास्थान मानलं असेल.. वडाच्या औषधी गुणधर्माचा तिनं वापर केला असेल.. मृत्यूवर मात या कल्पनेकडेही कितीतरी अर्थांनी पाहता येते..

सावित्रीनं जे केलं ते कोणत्याही प्रेमिकेनं केलं नसेल. या कथेद्वारे सावित्री आपल्याला आजच्या काळासाठीही उपयुक्त असं खूप काही सांगते आहे. तिनं ईश्वर निर्मित जीवसृष्टी, मानवी जीवन व मृत्यूचा खरा अर्थ समजून घेतला असेल, 'निसर्गाशी साहचर्य हेच जीवन' हे ती आपल्याला सांगू पाहत असेल..

मुलीला वाढवताना आधी तिच्या मनात तिच्या जीवन-ध्येयाची पेरणी करायची आणि मग त्याला अनुकूल असे पुढचे जीवन व जोडीदार तिला निवडू द्यायचा हे ती सांगत असेल.. आई-वडिलांनी ज्ञान, सामर्थ्य आणि स्वातंत्र्य दिलं तर त्याचा वापर कसा करायचा, आणि ज्याच्यावर प्रेम केलं त्याच्यासाठी मृत्यूशीही भांडायला कचरायचं नाही, आपल्या स्वप्नाचा पाठलाग सोडायचा नाही हे ती सांगू पहात असेल..

'योग' यमाने दिला आहे असं मानतात. सावित्रीनं माणसाला दीर्घायुषी करणारा योग यमाच्या संवादातून आणला असेल..

द्युम्त्सेनाला तिनं योग्य 'जीवनदृष्टी' दिली असेल..

तीव्र इच्छाशक्ती, शुद्ध हेतू, परिपूर्ण प्रयत्न केले आणि त्याला ईश्वरी श्रद्धेची जोड दिली तर चमत्कार वाटावे असे परिवर्तन शक्य आहे, हे ती आपल्याला सांगू पाहत असेल..

पुराणकथांना नाकारणे, त्यांची थट्टा करणे, उपहास करणे सोपे आहे. त्यांना प्रतिकात गुंडाळून त्यातली प्रेरणा घुसमटून टाकणे हेही सोपेच आहे. पण नव्या दृष्टीने त्यांच्याकडे पाहिले, त्यांचे कालसुसंगत अर्थ लावले तर या कथा आताच्या समाजाला कितीतरी बळ पुरवतात.

सावित्री केवळ पतीच्या मागे जाणारी त्याचे अनुसरण करणारी 'प्रति'गामी नाही. पती ज्या जीवनरेषेशी थांबला, जीवनविन्मुख झाला त्या मर्यादेला ओलांडून पुढे जाणारी व त्याला पुन्हा जीवनसन्मुख करणारी, आपल्या जीवनध्येयाच्या मागे यायला लावणारी, नेतृत्व करणारी 'पुरो'गामिनी आहे !

सावित्रीचे व्रत म्हणजे केवळ उपवास नाही. उपहास तर मुळीच नाही! सावित्रीच्या उपवासातून मिळवायचे आत्मबल, शिकायचा संयम, वडाच्या पूजनातून घ्यायची चिवट विजिगीषा.

जपायचं निसर्गाशी असलेलं नातं. पर्यावरण आणि समृद्धी यातल्या संतुलनाचा धागा तुटू द्यायचा नाही.

सात जन्म ही सोबत संपूच नये असं वाटावं असं साहचर्य, असं माधुर्य सहजीवनात निर्माण करायचं, अर्थात दोघांनी !

दैववादाच्या क्षीण धाग्यात गुंडाळून ठेवलेली सावित्रीची कथा सोडवायची आणि प्रयत्नवादाच्या भक्कम वटवृक्षाच्या रूपात रुजवून घ्यायची!

**– विनीता तेलंग**
ज्येष्ठ संशोधक, मुंबई
भ्रमणध्वनी : ९८९०९२८४११

# महिला कुस्तीपटूच्या आंदोलनातील विविध पैलू

*दिल्लीमधील महिला कुस्ती खेळाडूंचे आंदोलन हे कोणकोणत्या सामाजिक मुद्द्यांकरिता आहे, त्यांची भूमिका काय, लैंगिक छळ इ. कधीही पुढे न आलेल्या महत्त्वाच्या मुलभूत प्रश्नांचा ऊहापोह करणारा लेख – संपादक*

दिल्लीमधील महिला कुस्ती खेळाडूचे आंदोलन मागील ३० दिवसापेक्षा अधिक काळापासून सुरू आहे. माध्यमांनी ज्या पद्धतीने हे आंदोलन व यातील मागण्या हाताळायला हव्या होत्या तशा त्या हाताळल्या नाहीत. परंतु सामाजिक माध्यमांनी या आंदोलनास संपूर्ण जगामध्ये प्रसारित केले. आंतरराष्ट्रीय कुस्ती संघ आणि ऑलम्पिक संघाने देखील या महिला कुस्ती खेळाडूंना मिळालेल्या वागणुकीचा निषेध केला आहे. या महिला कुस्ती पटूच्या मागण्या ऐकता असे लक्षात येते की, शासनाने आणि पोलिसांनी फक्त कायद्याप्रमाणे काम करावे अशी त्यांची मागणी आहे. जर खरंच अशी मागणी असेल तर शासन आणि पोलिस, या प्रकरणामध्ये कायद्याप्रमाणे काम करत नाही का, या विषयाची चर्चा होणे आवश्यक आहे. २८ मे रोजी नवीन संसदेसमोर महिला पंचायत भरविण्यासासाठी या कुस्तीपटूंनी हाक दिली. दिल्ली पोलिसांनी कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून यांना अडवले आणि नंतर जंतर-मंतर येथील त्यांचे सामान फेकून देऊन त्यांना तिथे आंदोलन करण्याची परवानगी नाकारली. यानंतर या आंदोलनकारी कुस्तीपटूंनी त्यांनी मिळवलेली पदके गंगा नदीत विसर्जित करण्याची घोषणा केली आणि अचानकच हे प्रकरण नवीन स्वरूपात ज्वलंत झाले. या संपूर्ण प्रकरणात अनेक महत्त्वाचे मुद्दे निर्माण होतात. कायदेशीर, न्यायिक, नैतिक आणि सामाजिक. एक सामान्य भारतीय नागरिक म्हणून आपण या आंदोलनाकडे, त्यांच्या मागण्यांकडे, शासन आणि पोलिस यांच्या वागणुकीकडे कसे बघायचे याची चर्चा करणे आवश्यक वाटते म्हणून हा लेख मांडत आहे.

महिलांच्या विरोधात होणाऱ्या एकूण अपराधांमध्ये ५% अपराध हा कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक अत्याचार असतो. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक अत्याचाराचा आरोपी हा मुख्यतः त्याच ठिकाणी काम करणारा पुरुष असतो व खूपदा ज्या पुरुषाकडे अधिकार असतात अशी व्यक्ती. 'कास्टिंग काऊच', 'मी टू' अशा अनेक बाबी आपण खूपदा ऐकल्या असतील. घराबाहेर काम करणाऱ्या महिलांना लैंगिक अत्याचारा-पासून संरक्षण मिळावे म्हणून, विशाखा विरुद्ध राजस्थान राज्य या ऐतिहासिक निर्णयामध्ये सर्वोच्च न्यायालयाने कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचारासंबधी काही मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित केली व जोपर्यंत भारतीय संसद या विषयावर कायदा तयार करत नाही तो पर्यंत ही मार्गदर्शक तत्त्वे लागू राहतील असा आदेश दिला. १९९७ मध्ये पारित या आदेशानंतर 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) कायदा, २०१३ मध्ये पारित करण्यात आला. १९९७ ते २०१३, जवळपास १६ वर्षं संसदेने लैंगिक अत्याचाराचा विषय सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांवर अवलंबून ठेवला. असा कायदा करणे घराबाहेर काम करणाऱ्या महिलांना नक्कीच एक संरक्षण प्रदान करतो, परंतु काही ठरावीक घटना, त्या घटनेतील कारवाई पुन्हा एकदा महिलांभोवती भीतीचे सावट निर्माण करते. महिला कुस्तीपटूंचे प्रकरण हे भीतीचे सावट निर्माण करणाऱ्यापैकी एक प्रकरण. आता यातील इतर मुद्यांवर चर्चा करू या.

कायदेशीर : या एकूण प्रकरणामध्ये प्रामुख्याने तीन कायद्यांचा समावेश होतो, भारतीय दंड संहिता, कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, निषेध आणि निवारण) कायदा २०१३ आणि लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ (पॉक्सो कायदा). साधारणतः या कायद्याप्रमाणे जर एखादी तक्रार आली असेल तर पोलिसांचे हे प्रथम कर्तव्य आहे की, त्यांनी एफआयआर नोंदवून तपास सुरू केला पाहिजे. २०१३ च्या कायद्याप्रमाणे कामाच्या ठिकाणी कार्यरत असलेल्या समितीकडे तक्रार नोंदविता येते. पण या तक्रारीमध्ये जर पॉक्सो कायद्याप्रमाणे गुन्हा झाल्याचे म्हणणे असेल तर या समितीकडे तक्रार झाली पाहिजे अशी काही अट नाही. या महिला कुस्तीपटूंना एफआयआर नोंदविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठवावे लागणे हे कायद्याचे राज्य असलेल्या देशासाठी चांगले संकेत नाहीत. कोणत्याही प्रकरणात एफआयआर झाल्यानंतर साधारणतः दोन बाबी या प्रथम दृष्ट्या घडताना दिसतात. पहिली म्हणजे पोलिस आरोपीला अटक करण्यासाठी धडपड करतात आणि दुसरी, आरोपी अटकपूर्व जामीन घेण्यासाठी न्यायालयात अर्ज करतो. आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, आरोपीला अटक केली पाहिजे की नाही हे पोलिसांच्या अधिकाराचा प्रश्न नसून, एकूण परिस्थिती लक्षात घेता सद्सद्विवेक-बुद्धीने घ्यायचा निर्णय आहे. गुन्ह्याची गंभीरता, आरोपीचे सामाजिक किंवा राजकीय स्थान, त्याचे पुरावे नष्ट करण्याची शक्यता, साक्षीदाराची सुरक्षितता आणि पीडित व्यक्तीचे सामाजिक स्थान व आरोपी पासून त्याला असलेला धोका. परंतु या प्रकरणात पोलिसांना आरोपीला अटक करण्याची घाई दिसली नाही आणि आरोपीलाही अटकपूर्व जमीन घेण्याची गरज भासली नाही. त्यामुळे एकूण परिस्थिती बघता कायद्याच्या प्रक्रियेचे पूर्णपणे पालन झाले आहे असे सध्यातरी जाणवत नाही.

न्यायिक : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे आणि विविध उच्च न्यायालयाचे महत्त्व आणि महानता विशद करताना, कायद्याचे विद्यार्थी म्हणून आम्ही अनेकदा त्या प्रकरणांचा उल्लेख करतो जिथे माध्यमामध्ये प्रसारित झालेल्या बातमीच्या आधारे या न्यायालयांनी स्वतःहून एखाद्या प्रकरणाची दखल घेऊन आवश्यक असे आदेश पारित केले आहेत. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने मुरथल बलात्कार प्रकरणाची दखल घेतली, सर्वोच्च न्यायालयाने सोशल मीडियावरील अश्लील विडिओ संदर्भात आदेश दिलेत. अशी अनेक प्रकरणे आहेत जिथे न्यायालयाने स्वतःहून दखल घेतली आहे. या प्रकरणामध्ये, दिल्ली पोलिसांनी, मा. सर्वोच्च न्यायालयात 'एफआयआर दाखल करू' असे सांगितल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून जरी यामध्ये लक्ष घातले असते तर एक चांगला संदेश गेला असता. पण हेही समजून घेतले पाहिजे की, कोणत्याच न्यायालयावर हे बंधन नाही की, त्यांनी स्वतःहून दखल घेतली पाहिजे. विशेषतः या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने पीडितांना आवश्यक तो कायदेशीर मार्ग अवलंबण्याचा सल्ला दिलाच होता.

दुसरे असे की, या महिला खेळाडू आरोपी बृजभूषण सिंहच्या अटकेसाठी आंदोलन करण्यापेक्षा न्यायदंडाधिकारी पासून ते उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाच्या दारात का गेल्या नाहीत? सामान्य माणसे ह्याच पद्धतीने आरोपीच्या अटकेसाठी प्रयत्न करतात. आपण हे समजून घेतले पाहिजे की, पोलिसांना तपास करण्यासाठी जर आरोपीच्या अटकेची गरज भासत नसेल पण त्याच वेळी पीडितांना आरोपीचे स्वतंत्र असणे स्वतःच्या जीवितासाठी किंवा पुराव्याच्या संरक्षणासाठी किंवा साक्षीदाराच्या सुरक्षेतेसाठी धोकादायक वाटत असेल तर ते स्वतः आरोपीच्या अटकेसाठी न्यायालयात अर्ज करू शकतात. या प्रकरणामध्ये असे का केले जात नाही याचाही विचार केला गेला पाहिजे. न्यायालयात जेव्हा आरोपीच्या

अटकेसाठी अर्ज केला असता, तर पोलिसांना आरोपीला अटक न करण्याची कारणे सांगावी लागली असती. कदाचित त्यामुळे महिला कुस्तीपटूंची मागणी लवकर मान्य होऊ शकली असती.

नैतिक : कुणावर आरोप झाला याचा अर्थ असा होत नाही की, ती व्यक्ती त्या आरोपाची दोषी आहे. पोलिस-तपास, पुरावे आणि न्यायालयीन प्रक्रिया आरोपी दोषी आहे की नाही ते ठरवेल. परंतु अशी व्यक्ती जर एखाद्या मोठ्या पदावर आली तर त्याने नैतिकदृष्ट्या त्या पदावरून राजीनामा द्यायला पाहिजे एवढी नैतिकता भारतीय राजकारणात हवी, ही नागरिकांची अपेक्षा असणे काही गैरवाजवी नाही. गोव्याचे मंत्री, मेघालयाचे राज्यपाल असे काही अलीकडच्या काळातील उदाहरण आहे, जिथे लैंगिक अत्याचारासंबंधी आरोपाच्या आधारवर राजीनामा देण्यात आला होता. एम जे अकबर हे एक मोठे नाव आहे, जिथे अशाच कारणासाठी राजीनामा देण्यात आला होता. राजीनामा देणे हे फक्त नैतिकदृष्ट्या महत्त्वाचे नसून तपास योग्य, निष्पक्ष झाला या समजुतीला बळकटी आणण्यासाठी देखील आवश्यक आहे. महिला कुस्तीपटूंच्या प्रकरणात जे आरोपी आहेत ते भारतीय कुस्ती संघाचे अध्यक्ष होते, त्यांचा कार्यकाळ संपुष्टात आल्यामुळे आज तरी राजीनाम्याचा प्रश्न उद्भवत नाही.

सामाजिक : शेवटचा जो मुद्दा इथे उपस्थित करू इच्छित आहे तो सामाजिक जाणिवेचा आहे. आपण लक्षात घेतले पाहिजे की, जेव्हा निर्भया प्रकरण घडले होते तेव्हा असे वाटत होते की, संपूर्ण समाज जागृत झाला आहे आणि यानंतर महिलांविरोधात बलात्कार सारखा अतिगंभीर गुन्हा तर सोडाच, पण छेडछाडीचा देखील गुन्हा करण्याची हिम्मत कुणी करणार नाही. समाजाचा एवढा दबाव सरकारवर होता की, फौजदारी प्रक्रिया संहिता आणि बाल गुन्हेगार कायदा यामध्ये सुधारणा करावी लागली. २०१२ नंतर अशी अनेक प्रकरणे भारतामध्ये घडली, परंतु यावेळेस समाजाने एका सुराने त्याचा विरोध केला असे घडले नाही. आरोपीच्या समर्थनार्थ मोर्चे निघाल्याचा बातम्या आपण वाचल्या असतीलच. सामाजिक माध्यमांमध्ये समाजाचे रूप बघायला मिळते. महिला कुस्तीपटू खरे बोलत आहे की खोटे, हा तपास आणि पुराव्याचा विषय आहे. पण समाज म्हणून जर आपण पीडितांच्या विरोधात उभे राहणार असू तर हे संकेत भविष्यकाळासाठी चांगले नाही. समाजाने आरोपीविषयी चांगला-वाईट एकही शब्द नाही उच्चारला तरी चालेल, पण जर पीडितांच्या विरोधात बोलत असेल, लिहीत असेल तर सामाजिकरीत्या हे आपले पतन आहे, हे लक्षात घ्यायला पाहिजे. हिंदी आणि इंग्रजी माध्यमांनी ज्या पद्धतीने पहिल्यांदा या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले ते आणि नंतर ज्या पद्धतीच्या बातम्या दाखवल्या, ते देखील एक सभ्य समाज म्हणून आपल्या सगळ्यांना विचार करायला भाग पाडणारे आहे.

**– प्रा. विनोद एच वाघ**
विद्या प्रसारक मंडळाचे टिएमसी विधी महाविद्यालय
ठाणे

•••

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

मन:शांती आणि आत्मिक आनंदाचे खाते शिगोशीग भरायचे असेल तर सतत ईश्वर स्मरण करावे.

# इंद्रजीत वध आख्यान अर्थात सती सुलोचना!

*लोकसंस्कृतीमध्ये कीर्तनाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. कीर्तनांमध्ये वेगवेगळी आख्याने सांगितली जातात. पूर्वीच्या काळी कीर्तनात सांगितलेल्या सुलोचना आख्यानाबद्दल प्रस्तुत लेखात अत्यंत रंजकपणे प्रकाश टाकला आहे. – संपादक*

उन्हाळ्याची सुटी लागली आहे. संध्याकाळी मस्त सडा टाकून गार केलेल्या अंगणात, जेवणे आटोपण्यापूर्वीच गोधड्या टाकलेल्या आहेत. जेवणे आटोपल्यावर आम्हा बालगोपाळांनी दंगामस्ती करून, घरातील मोठ्यांच्या आवरासावरीला हातभार लावून, काम अजून वाढवण्याचा संभाव्य धोका टळावा, यासाठी घरातील एका वडिलधाऱ्याची आमच्यासाठी नेमणूक होत असे. मात्र आपल्यासोबत कोणी नाही, हा अन्याय आमच्या मनात येऊ नये, म्हणून ही मोठ्यांनी लहानांशी केलेली तडजोड असायची, हा पण एक विचार यात असावा. आम्ही रात्रीचे जेवण हेच, आमच्या दिवसभराच्या प्रचंड उद्योगामुळे कसेबसे केलेले असायचे. आमच्या डोळ्यांत झोप मावत नसायची, पण नीट जेवले नाही, तर रात्रीअपरात्री उठून खायला मागतील, ही भीती मोठ्यांना!

जेवण आटोपले, की गारगार झालेल्या अंथरूणावर! अंगणातील आकाशाकडे, तारमंडळाकडे पहात, जी चांदणी समोर येई, त्याला अनुसरून काहीवेळा गोष्ट सांगितली जाई. मग त्यात, व्याधाची चांदणी असे, शुक्राची चांदणी असे, धृवतारा आणि सप्तर्षी असत, गुरुचा वा शनिचा ग्रह दिसला हे कल्पिलेले असे, मंगळाचा तारा असे आणि अजून काही काही असे ! सर्वच ग्रहतारे आम्हाला दिसावे किंवा समजावे, हा पण आमचा आग्रह नसे. शनीच्या साडेसातीवर हमखास उतारा आणि रामबाण औषध म्हणून 'जय बजरंगबली' आमच्यासमोर प्रभू रामचंद्रापेक्षाही लवून उभे असत. या सर्व गोष्टी आम्हाला सांगण्याचे काम, आनंदाने आमच्या आजोळी बहुदा करायची, ती आमची पुष्पामावशी ! ती आता या जगात नाही. मात्र तिच्या सांगीतलेल्या गोष्टी अजून आठवतात.

तसं बघीतलं, तर गोष्टी ऐकायला कोणाला आवडत नाही? यांत लहानमोठा असे काही नाही. जरा काही ऐकावेसे वाटले, की आजपण आपले कान टवकारले जातात. डोळ्यांसमोर चित्र आणा नुसते, की समोरचा मंचावर उभा आहे. आपला तिन्ही सप्तकात फिरणारा आवाज, कौशल्याने उपयोगात आणून सांगितल्या जाणाऱ्या कथेतील भावभावना आपल्यापर्यंत पोहोचवीत आहे. समोर बसलेला श्रोतृवर्ग कथा ऐकण्यात तल्लीन झालेला आहे. कथा ऐकायला आलेली बाळगोपाळ मंडळी तर या जगातून, त्या कथेच्या विश्वात कधीच पोहोचली आहे. केवळ ऐकणारेच तल्लीन झालेले नाही, तर वातावरण देखील कथामय झाले आहे. त्या वक्त्याच्या भावविश्वात विरून गेले आहे. अशी अवस्था निर्माण करण्याचे सामर्थ्य असणारे वक्तृत्व, फार कमी जणांकडे असते. 'वक्ता दशसहस्रेषु' उगीच म्हणत नाही!

ज्यांचे निरूपण, कथाकीर्तन मी ऐकले, त्यांची लहानपणापासून जसे आठवेल तशी यादी करायची म्हटले, तर प्रवचनकार, किर्तनकारांपासून सुरुवात होते, ती व्याख्यात्यांशी थांबते! दत्तजयंती उत्सवात दत्तमंदिरात रावेरला किर्तनासाठी यायचे, ते उज्जैनकर महाराज! नंतर दत्तमंदिरात आणि थड्यावरील तोबा गर्दीतील ज्यांचे कीर्तन आठवते, ते औरंगाबादचे कमलाकरबुवा औरंगाबादकर!

तसे रावेरला खूप ऐकायला मिळाले नाही, ऐकायला मिळाले ते जळगांवला! निजामपूरकरबुवांचे कीर्तन ऐकले! ज्यांच्या कीर्तनाच्या तारखेसोबतच त्यावरील बंदीची बातमी यायची, ते गोविंदस्वामी आफळे! अगदी अलीकडचे सांगायचे, तर आमचे मित्र, योगेश्वर उपासनी! कामानिमीत्त पूर्वी मुंबईला, दादरला रहायचो, त्यावेळी तिथं जवळपास दोन आठवडे एका कीर्तनसंस्थेत जेवण झाले की जायचो. तिथं रोज रात्री नऊ ते अकरा, असे दोन तास कोणाचेतरी कीर्तन असायचे. छान वाटायचे.

ज्यांचे प्रवचन ऐकायला विद्वान मंडळी यायची, ते सोनोपंत दांडेकर, मुळेशास्त्री, विष्णूजी क्षीरसागर! आपल्या भाषेच्या साधेपणाच्या विद्वत्तेने गुंतवून ठेवणारे राम शेवाळकर, शिवाजीराव भोसले, दाजी पणशीकर! अभ्यास शब्दाशब्दातून जाणवे असे न. र. फाटक, सेतुमाधवराव पगडी, पुरुषोत्तम नागेश ओक, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी! काव्य-शास्त्र-विनोद व साहित्यातले अनुभव सांगणारे - विद्याधर गोखले, ना. सं. इनामदार, ग. वा. बेहरे, जयंत नारळीकर, आदिती पंत!

- काय आणि किती नांवे सांगावीत? मात्र माणूस वयाने कितीही मोठा झाला, तरी त्यांच्यापुढं असणारा एक चेहरा, कायम असतो; तो पुसला जात नाही. त्याच्या पुढच्या आयुष्यात यापेक्षा देखील अनेक कर्तृत्ववान भेटतात, पण हा बालमनांतील चेहरा या सगळ्यांना दशांगुळे पुरून उरला असतो. तसा माझ्यासमोर एक प्रसिद्ध चेहरा आहे, आमच्या गांवच्या कीर्तनकार, सुधाकर देवराव मुकीम उपाख्य मुकीमबुवा यांचा! नारदीय कीर्तन परंपरा मानणारे आणि पाळणारे! त्यांचे मी ऐकलेले बहुदा शेवटचे कीर्तन म्हणजे, माझ्या मुलाच्या पहिल्या जन्मदिनी झाले ते! त्यांचे आणि आमचे पिढीजात संबंध आणि जाणेयेणे ! त्यांना मला जिथे शक्य असेल तिथे ऐकले!

तसे ते सांगत, की ते मूळचे पैठणच्या गोदाकाठचे! त्यांचे पूर्वज म्हणजे संत अमृतराय! त्यांचे आपल्याला माहीत असलेले, प्रसिद्ध पद म्हणजे - 'अजी मी ब्रह्म पाहिले' हे आशा भोसले यांनी गाऊन सोन्याला सुगंध दिलेले पद! मात्र कधीतरी हे पैठणच्या एकनाथांच्या गोदाकाठाला सोडून रावेरला मुक्ताईच्या तापीकाठी आले, आणि तिथेच स्थायिक झाले. त्यांच्याकडचा 'दास नवमीचा' मोठा उत्सव! त्यांची आवडती आख्याने म्हणजे - प्रभू रामचंद्र, भगवान श्रीकृष्ण, संत नरसी मेहता, चिलयाबाळ, संत ज्ञानेश्वर, संत रामदास, संत सेना न्हावी, संत सावता माळी, संत गोरा कुंभार, दामाजीपंताचे आख्यान अशी पुराण आणि संत महात्म्यांची कितीतरी असायची !

सध्या दूरदर्शनवर 'रामायण' आणि 'महाभारत' सुरू आहे, ते बघतोय ! आणि आज त्यांचे अजून एक आख्यान आठवले, ते म्हणजे 'इंद्रजीत वध आख्यान' म्हणजे 'सती सुलोचना - इंद्रजिताची पत्नी' हिची कथा !

आपल्या नेहेमीच्या अमृतराय यांच्या पदाने, म्हणजे 'आम्ही जाणो हरिचे पाय' कीर्तनाची सुरुवात व्हायची. पूर्वरंगात एखाद्या श्लोकाचे निरूपण केले, की उत्तररंग सुरू व्हायचा. पूर्वरंगातील निरूपणास अनुरूप अशी कथा सांगितली जायची. आम्हा बाळगोपाळांच्या दृष्टीने ती गोष्ट महत्त्वाची असायची. रामरावण युद्धातील इंद्रजीत वध आख्यान लावायचे काही वेळी ते!

प्रभू रामचंद्राचे सीतावियोगाचे दुःख, सीतेला तिच्या पतीचा म्हणजे रामाचा होणारा विरह आणि रावणाने तिचा आरंभलेला छळ, रावणाचा पराक्रम आणि तो धर्माचरण न केल्याने कसा वाया गेला, कुंभकर्ण आणि विभीषणाने रावणाला समजवण्याचा वेगवेगळ्या वेळी केलेला अयशस्वी प्रयत्न आणि त्यांनी निवडलेले मार्ग!

---

आपल्या भावनांपेक्षा आपल्या आचरणाचा प्रभाव समाज मनावर जास्त होतो.

यासोबत ते सांगत, ते रावणाचा पुत्र मेघनाद हा इंद्रजित कसा झाला, आणि त्याचा रामरावण युद्धातील पराक्रम!

महापराक्रमी रावणाचा मुलगा मेघनाद, म्हणजे इंद्रजिताची पत्नी, सुलोचना, ही नाग वंशाची! शेषनागाची मुलगी, म्हणजे पराक्रमी व प्रसिद्ध घराण्यातील! आपल्या मुलीची प्रत्येक पित्याला असलेली काळजी, प्रत्येक मुलीला, आपल्या वडिलांचा असलेला अभिमान आणि आपल्या संकटाच्या वेळी ते कोणत्याही परिस्थितीत धावून येत, मुलीचे संकट दूर करतील, हा त्यांच्याप्रति असलेला विश्वास!

बापलेकीच्या नात्याला आणि त्यातील चिवटपणा, रेखाटायला भलेभले थकतात! आपल्या मानसकन्येची, शकुंतलेची रवानगी तिच्या सासरी करताना, आपल्या भावना रोखू न शकणारे कण्व मुनी! त्याचे चित्रण करून संस्कृतातील 'अभिज्ञानशाकुंतलम' ही सर्व साहित्यातील अजरामर कलाकृती, निर्माण करणारा, कविकुलगुरु कालीदास! साहित्याचा विषय ही मोठा, आणि कलाकृती निर्माण करणारे पण मोठे!

सुलोचना, जिचे नयन म्हणजे डोळे सुंदर आहे, अशी! पतिव्रता! अलीकडे सुलोचना, हिचे डोळे कसे असतील ते सांगता येत नाही. सीताकांत स्मरण जयजय राम, हऽऽऽरी विठ्ठल! बुवासाहेब सांगत असायचे! रामायणातील इंद्रजीत हा महापराक्रमी, आपल्या पित्यासारखाच! त्याने प्रत्यक्ष इंद्राचा पराभव केला, म्हणून तो इंद्रजीत! याचे युद्ध झाले, ते लक्ष्मणाशी! घनघोर संग्राम, तीन दिवस आणि तीन रात्री!

इंद्रजीताने फेकलेल्या नागपाशात रामलक्ष्मण बद्ध झाले. हनुमानाने भगवान विष्णुचे वाहन गरुडाला बोलावून नागपाशातून मोकळे केले. दुसऱ्या दिवशी पुन्हा भीषण संग्राम, यांत इंद्रजीताने फेकलेली शक्ती लक्ष्मण सहन करू शकला नाही. तो बेशुद्ध झाला. सैन्यात चिंतेचे वातावरण! प्रभू रामचंद्रांना झोप तरी येईल का? वैद्य सुषेण यांना आणले. महाराज, पेशंटकडून ॲडव्हान्स पैसे न घेता, औषध देणारे दवाखाने आणि डॉक्टर होते त्याकाळी! सीताकांत स्मरण जयजयराम!

तर महाराज, वैद्य सुषेण यांनी लक्ष्मणाची नाडी पाहून, उपचारासाठी संजीवनी वनस्पती आणायला सांगीतली. हे सर्व लंकेत तर वनस्पती हिमालयात, सूर्योदयाच्या पूर्वी ती आणायला हवी, तरच उपयोग! बजरंगबली निघाले हिमालयात, संजीवनी वनस्पती आणायला! तिथे पोहोचले. आजच्या गाड्यांसारखी त्यांची गाडी लेट नव्हती जात! तिथे गेल्यावर पवनपुत्र हनुमानाला समजेना हो, सर्वच वनस्पती चमचम लखलखत होत्या. कोणती घ्यावी? महाराज, तो रामसेवक हनुमान होता. 'आता काय करायचे, याचे मार्गदर्शन मिळावे, म्हणून पत्र लिहीणारा, आजचा सरकारी कर्मचारी नव्हता! रामाच्या काळातला, सत्ययुगातला होता. कलियुगातला नाही. त्याने उचलला संपूर्ण द्रोणागिरी पर्वत आणि निघाला! सर्व अडचणी पार करून सूर्योदयापूर्वी पोहोचला. वैद्यांनी हव्या त्या वनस्पतीपासून औषध केले आणि दिले. लक्ष्मण शुद्धीवर आला. रामाच्या सैन्यात आनंदीआनंद!

सकाळी लक्ष्मण इंद्रजिताशी लढण्यास सज्ज! त्या दिवशी मात्र लढाईची कमाल झाली! शेवटी आपल्या अमोघ अस्त्राने लक्ष्मणाने इंद्रजिताचे हात व मस्तक उडवले. ते थेट पडले त्याच्याच प्रांगणात! सुलोचना बाहेर आली, तो आपल्या पतीचे मस्तक आणि हात! ती दु:खीत झाली, पण तिला शंका आली. पतिव्रता असल्याने, 'तिने घटना काय घडली ते लिहीण्यास सांगीतले.' तिच्या पातिव्रत्याच्या सामर्थ्याने झालेली घटना, त्या हाताने लिहीली. लक्ष्मणाने आपल्या इंद्रालासुद्धा पराभूत करणाऱ्या आपल्या पतीला मारले, हे समजल्यावर तिचा संताप अनावर झाला.

---

मनुष्याचे मोठेपण हे त्याच्या वयावर नव्हे तर कर्तृत्त्वावर अवलंबून असते!

'स्वामी, काय झाले हे ? मी आपल्या पराक्रमावर निश्चिंत होते. आपल्याला जर शंका होती, तर मला कल्पना दिली असती. मी माझ्या पित्याला बोलावले असते. माझे वडील तुमच्या मदतीला आले असते, तर जगातील कोणीही तुमचा पराभव करू शकले नसते.' आपल्या पत्नीचे, सुलोचनेचे हे ऐकल्यावर, मात्र ते मस्तक खदखदा हसू लागले. तिला भीती वाटली.

महाराज, इंद्रजिताचे जीव नसलेले मस्तक का हसले ? बुवासाहेब, उजवा हात पेटीवर आणि डावा हात तबल्यावर ठेवून त्यांना थांबवत विचारतात. आम्ही तर अवाक झालेलो. मेलेल्या माणसाचे हात लिहून राहिले आहे, आणि मुंडके हसते आहे, हे बघीतल्यावर भुताटकी यापेक्षा वेगळी काय असणार आहे ? पण प्रत्यक्ष रामलक्ष्मणाकडून आणि हनुमंताचा उपस्थितीत हे असे भुताटकीचे प्रयोग होतील, यांवर विश्वास ठेवायला, आमचे मन तयार नसे. मात्र सुलोचनेप्रमाणे आमची पण गाळण उडाली असे.

'महाराज, इंद्रजिताचे शिर बोलू लागते.' बुवासाहेब सांगत असतात. आम्ही सावरून बसतो.

'सुलोचना, ज्यांना म्हणजे तुझ्या वडिलांना, तू माझ्या मदतीला बोलावणार होती, त्या शेषनागाचेच लक्ष्मण अवतार आहे. त्यांनीच मला मारले आहे. ज्यांनी आपल्याला वाचवायचे असते, तोच जर आपणांस मारणार असेल, आपला संहार करणार असेल, तर येथील आपले कार्य संपले आहे, असे समजावे.' इंद्रजिताच्या शिरातून हे बोलणे ऐकल्यावर मात्र तिच्या डोळ्यांतून घळघळ अश्रुधारा लागल्या.

'आपला पती इतक्या चुकीच्या मार्गावर गेला, इतका अधर्माने वागू लागला, की प्रत्यक्ष वडिलांनी अवतार घेऊन पतीचा नाश केला. आता हे हात आणि शिर घेऊन, युद्धभूमीवर जाऊन रामलक्ष्मणांकडून प्रार्थना करून पतीचे धड आणावे आणि आपल्या पतीसोबत सती जावे.' सुलोचना मनाशीच बोलत होती. बघताबघता ती निघाली त्यासाठी ! सतीच्या पतिव्रतेच्या विनंतीवर प्रभू रामचंद्र नाही कसे म्हणणार ?

तेवढ्यात पेटीवाल्याने भैरवीचे सूर लावलेले असतात आणि तबलेवाल्याने तबल्यावर थाप दिली असते.

'आता जर तुम्ही सुलोचनेला विचारले, तर ती सांगणार, 'मला आता काही माहीत नाही, आम्ही काही जाणत नाही. आम्ही जाणतो, ते एकच 'आम्ही जाणो हरीचे पाय!'

सर्व कीर्तन डोळ्यांसमोर उभे राहीले ते रामायण पाहतांना! मात्र त्यांत ही कथा आली नाही, का कुणास ठाऊक? सती सुलोचना ही खूप गाजलेली कथा आहे. यांवर तीन-चार विविध भाषांमधले चित्रपट पण निघाले आहेत. काल रामायणातील इंद्रजीत वध बघताना, हे सर्व आठवले. कुठल्या वेळी, काही आठवते आणि मग लिहून ठेवावे वाटते, आपल्या सर्वांसाठी!

**– माधव भोकरीकर**
पुणे

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहे.**

**– संपादक**

# आभाळ आणि मातीमध्ये : दासू वैद्य यांची कविता

*ज्येष्ठ मराठी कवी दासू वैद्य यांच्या एका कवितेवर प्रकाश टाकणारा व रसग्रहण करणारा डॉ आनंद कुलकर्णी यांचा लेख – संपादक*

आभाळ आणि मातीमध्ये
पावसाची नाळ असते
नाळच जर कधी तुटली
तर झाडांची आबाळ असते.

आभाळ आपलं गात असतं
चांदण्याचं निमित्त करून
माती मनात झुरत असते
झाडाचं शल्य धरून.

पाखरं झाडांवर चिवचिवतात
काही तर गाणी गातात.
एखादाच पारवा घुमत राहतो
झाडाच्या अबोल दु:खाचा
एक अनोखा शब्द होतो...

– दासू वैद्य

दासू वैद्यांची ही अतिशय सुंदर, मनभावन रचना आहे. सूचकता ही कवितेच्या अस्तित्वाची पूर्वअट असते. आणि सूचकता प्रतिमेच्या माध्यमातून कवितेत येते. कसदार कवितेत आशय प्रतिमांमधून मुखर होत राहतो. या कवितेत हे घडतं. आभाळ, माती, पाऊस आणि पारवा सगळेच प्रतिमेच्या रूपात कवितेच्या प्रतलात उतरतात. मग हे प्रतल विस्तारत राहतं. विस्तार तरी किती असावा? आभाळापर्यंत. इथे शब्द आभाळ आहे, आकाश नाही. आकाश अमर्याद, अनंत आहे. त्यात आपलेपणा, ओढ नाही. तुटकपणा, त्रयस्थता आहे. अमर्याद विस्ताराचा दर्प आहे. म्हणून आकाश आणि माती यांचं नातं आहे, पण नाळ नाही. नात्यात नाळ असली की नातं अस्सल जिव्हाळ्याचं होतं. नाळ मध्ये ओलावा असतो. असं नाळ असलेलं नातं निभवायची सक्ती नसते. कारण त्यात अंतरीचा जिव्हाळा असतो. आभाळ भरून येतं, आकाश निरभ्र, निरिच्छ राहतं. अंगभूत स्वयंभुपण असलेलं अहंकारी आकाश! आभाळ वेगळं असतं. मायाळू, प्रेमळ. म्हणून त्याची नाळ जुळते मातीशी. आभाळाचं भरून येणं दोन्हीही असतं– सर्जनशील आणि संजीवक. मातीला नवे अंकुर देणारं म्हणून सर्जनशील आणि मरणासन्न सृष्टीला पाऊसधारांनी जीवनदान देणारं म्हणून संजीवक. आभाळ झुकतं, वाकतं. धरेला टेकतं तेव्हा मातीला स्पर्श होतो. हा स्पर्श पावसाच्या रूपात होतो. पण हा स्पर्शच झाला नाही तर? आभाळ आणि मातीमधील पावसाची नाळ तुटली तर? मग झाडांची अबाळ ठरलेली असते. आभाळ आणि माती ही पावसाची नाळ कसोशीनं जपतात. झाडांना पाऊस लागतोच ना! झाड तर मातीसाठी जीव की प्राण. जणू माती तिचं अस्तित्व झाडातून दाखवत असते. झाडांचे रंग, फुलं, फळं, पानं, फांद्या यामध्ये स्वत:ला शोधते आणि यातूनच व्यक्त होते. बहुतेक मातीला झाडांच्या पलीकडे जाऊन माणसाला आपलंस करणं अजूनही जमलेलं नाही. कसं जमणार? झाडं मातीतून उगवतात, माणसं अहंकारातून उगवतात! झाडं मातीला घट्ट धरून राहतात, माणसं माती सोडून आकाशात भराऱ्या मारतात! मग मातीची माणसांशी नाळ कशी जुळायची? माती अमूल्य आहे हे झाडांना कळलंय ना म्हणून मातीचा झाडांवर जीव आहे. पण हे बहरायचं

असेल तर पावसाची नाळ जोडलेली असली पाहिजे. ती तुटली तर मग झाडांची फरपट होणार.

या कवितेत नाळ आणि शल्य हे दोन महत्त्वाचे शब्द आहेत. हे दोन्ही शब्द प्रतिमा नाहीत. ते अवस्थांचे सूचक आहेत. नाळ ही अवस्था आहे जोडलेलं असण्याची. हे जोडणं बाहेरून आलेलं, बळंच लादलेलं, कृत्रीम, दिखावू नाही. ते उपजत, अंगभूत आहे. आईचं बाळाशी जोडलेलं असणं जसं सहज, नैसर्गिक असतं तसं सहज सुंदर. ही जोडलेली अवस्था आनंदकारक असते, म्हणजे आनंद देणारी असते. आभाळाचं मातीशी जोडलेलं असणं सृष्टीला नवचैतन्य देणारं असतं. पाऊस ही ती नाळ आहे जी आभाळाकडून जीवन घेते आणि मातीपर्यंत पोहचवते. ही नाळ अनंत काळापासून जोडलेली आहे. त्यामुळे मातीवर सुगंधी, सुंदर जीवन फुललंय. ही नाळ असलेली अवस्था भंगली तर शल्य असलेली अवस्था येते. हे अवस्थांतर वेदनादायी असतं. नाळ तुटलीय हे जाणवल्यावर आभाळ आणि मातीला दु:ख होणार. दु:ख अनुभवाच्या आणि व्यक्त करायच्या तऱ्हा मात्र निराळ्या आहेत. पाऊस देणारे ढग नसल्यामुळे आभाळ आकाश होतं. कोरडं, निरभ्र. असं झालं की मग चांदण्या चमकतात. नाळ तुटलीय याचं दु:ख आभाळाला आहेच. दु:खी आभाळ काय करेल? गाणं गाईल. दु:खात गाणंच गातात. किती सुंदर कल्पना आहे ही! कसं गायचं हे दु:खाचं गाणं? चांदण्यामधून हलकीसी धून सोडून द्यायची. या गाण्यात अधीरता आहे, ओढ आहे. नाळ पुन्हा जुळेल अशी अविनाशी इच्छा आहे.

नाळ तुटल्यामुळे मातीला होणारं दु:ख जरा वेगळं आहे. ती आभाळासारखं गात नाही. ती आतल्या आत झुरत राहते. तिचं झुरणं तिच्यातून उगवलेल्या झाडासाठी असतं. झाडाला बोलता येत नाही आणि गाणंही म्हणता येत नाही. झाडाला त्याच्या पानापानांत हिरवे दिवे लावता येतात. पण त्यासाठी पाऊस हवा. आभाळाचं बरं आहे; निदान चांदण्या तरी आहेत. मातीचं काहीच बरं नाही, कारण तिच्या उरात झाडाचं शल्य आहे. झाडावरच्या सगळ्याच पाखरांना झाडाचं शल्य उमगलेलं नाही. म्हणून ती चिवचिवतात, गाणी गातात. पण पारव्याला मात्र हे शल्य जाणवतं. प्रेमळ पारवा आभाळ आणि मातीतील नाळ तुटलेली आहे हे ओळखतो. पाऊस पडला की ही नाळ पुन्हा जुळेल हे तो जाणून आहे. मग तो घुमत राहतो. अबोल झाडाचं दु:ख पारव्याच्या घुमण्यातून मुखर होत राहतं. पावसाची सर यावी यासाठी पारवा घुमतोय. यात अनोख काय आहे? पारवा झाडाचं अबोल दु:ख आभाळापर्यंत पोहचवतोय. आणि हे पोहचवणं त्याच्या अस्वस्थ घुमण्यातून होतंय. झाडाशी किती नाळ जुळलेली आहे पारव्याची. नाळ जोडलेली असेल तर दु:खं सांगावं लागत नाही, ते आपोआप कळतं. नाळ नसलेल्या नात्यात मात्र शब्दात सांगूनही दु:ख कळत नाही. नाळ ही अवस्था या कवितेत वापरल्यामुळे ही कविता आर्त होते, गहिरी होते.

मला तर हे मनाच्या कॅनव्हासवर चितारलेलं चित्रच वाटतं. तुम्ही बघाल, अनुभवाल तशी कविता अनुभवता येते. कधी आभाळाच्या कोनातून, कधी मातीच्या, कधी झाडाच्या, कधी पारव्याच्या कोनातून. प्रत्येकवेळी नवे चित्र मन:पटलावर उमटते. कवितेत कवीचा आवाज नसावा ही आणखीन एक अट असते. या कवितेत कवीचा नाही तर निसर्गाचा आवाज आहे.

**– डॉ. आनंद कुलकर्णी**

इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, वारुलवाडी, नारायणगाव
ता. जुन्नर, जि. पुणे– ४१०५०४

•••

आपली दैनंदिन कर्तव्यं रोजच्या रोज आणि वेळेवर पूर्ण करा. त्यामुळे कामात सुसंबद्धता येते.

# दैत्यसूदन मंदिर

*आपल्या पाचही इंद्रियाद्वारे माणूस जगाचा शोध घेत असतो. या प्रक्रियेत तो आपल्या आत असलेल्या जगाचा 'स्व' चा शोध घ्यायला पूर्ण विसरतो. हे 'स्व' जागृत करणारं स्थान म्हणजे देऊळ. ते कां व कसे साध्य होऊ शकते, याचे विवेचन 'दैत्यसूदन' मंदिराच्या वर्णनातून मांडण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. – संपादक*

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू दिवंगत डॉ. विष्णू भिकाजी कोलते, ह्यांचे आत्मचरित्र असलेले 'अजूनी चालतोची वाट' हा ग्रंथ वाचण्यात आला. त्यात त्यांनी,' वास्तूपुरुष मंडळ आणि मानवी शरीर यांचा नेमका संबंध काय आणि त्याचे देऊळ रचनेत काय योगदान आहे' या बाबत संशोधन करण्यासाठी जगप्रसिद्ध लोणार जि. बुलढाणा येथील दैत्यसूदन मंदिरास भेट देऊन तेथील स्थापत्याचा सुमारे दहा दिवस अभ्यास केला. या अभ्यासात मंदिराच्या स्थापत्याने त्यांना कशी भूरळ घातली व शिल्पांच्या सौंदर्याने कसे पछाडले होते, हे वाचनात आले. त्यामुळे कधी जमलेच तर लोणारचे हे भव्य मंदिर बघायचेच अशी खूणगाठ मनाशी बांधली होती. शेवटी वयाच्या ६८ व्या वर्षी दि. २६ डिसेंबर २०२२ रोजी हा योग मुलगा ओजसने घडवून आणला आणि समजून घेण्याचा प्रयत्न केला या मंदिराच्या सुंदर कलाकृतींचा, तेथील स्थापत्याचा आणि इतिहासाचा!



प्रस्तुतचे हे मंदिर गावाच्या उत्तरेस सुमारे तीन एकर परिसरात वसले असून कधीकाळी पक्क्या परकोटात बंदीस्त होते. परकोटाच्या बाह्य भागावर पूर्व दिशेला पाय धुऊन आत प्रवेश करण्यासाठी दोन मीटर रुंदीचा काळ्या दगडात बांधलेला स्वच्छ पाण्याचा कालवा दिसतो. (सध्या हा कालवा निष्क्रिय आहे.) प्रवेशद्वार मोडकळीस आले असून, पटांगणातून आंत आल्यावर मंदिराची भव्यता दिसून येते. प्रथमदर्शनी हे कोणार्क येथील सूर्य मंदिराची प्रतिकृती असल्याचा भास होतो. मात्र, अष्टकोनी चौथरा दिसताच दक्षिणेतील होयसाळ स्थापत्याची आठवण (बेलूर येथील चन्नकेशवेश्वर मंदिर) येते. एकमात्र खरे की, बांधकाम करणारे कारागीर दक्षिणेतीलच होते आणि हे मंदिर त्या आधीचे म्हणजे दहाव्या शतकातील असून चालुक्यकालीन आहे. तेंव्हा सहावा चालुक्य अधिपती होता आणि त्याचे राज्य सध्याच्या कर्नाटकातील बदामीपासून विदर्भातील वाशीमपर्यंत होते. वाशीम तेंव्हा महत्त्वाचे ठाणे होते. त्यामुळे या राजाचे राणी लोकपालदेवीसह प्रशासनानिमित्त कांही काळ इथे राहणे झाले. लोणार तेंव्हा पौराणिक गाव म्हणून ज्ञात होते व दैत्यसूदन मंदिराचे बांधकाम अंतिम टप्प्यात होते. उसंत मिळताच राजाराणींचे इथे येणे झाले. राणी लोकपालदेवीचे माहेर बदामी जवळचे. राणी सहज बोलून गेली, 'मला माहेरची सतत आठवण येते. माहेर सोडून मी इथपर्यंत आले. मला माझ्या माहेरची आठवण म्हणून त्या धर्तीचं एखादं मंदिर बांधून द्या.' राजा पेचात पडला. पण लागलीच सावरत उत्तरला, 'नवीन मंदिर तर नाही, पण या मंदिराचा कळस तुझ्या मनाप्रमाणेच सजवतो.' राणीने यास अनुमोदन दिले आणि राजाने कळस बदामी पद्धतीने पूर्णत्वास नेला. सध्याच्या स्थितीत कळसाचा हा भाग मध्ययुगीन लहान – लहान विटात मशीद वा राजवाड्यातील कमानी सारखा परत बांधण्यात आल्याचे स्पष्ट दिसते. या बाबत गाईड श्री. अमोल सरदार (एमटीडीसी पुरस्कृत– मो. नं. ९९७५४४७०८८)

कोणतेही कार्य हे अडथळ्याशिवाय पार पडत नाही. शेवटपर्यंत जे प्रयत्न करत राहतात त्यांनाच यश प्राप्त होते.

ह्यांना विचारणा करताच त्यांनी पुष्टी जोडली, 'मंदिर बांधल्यावर नंतरच्या काळात मुघलांचे आक्रमण, त्यांचे आधिपत्य, हिंदू स्थापत्य व चालीरितीबाबत असलेला राग व भरीसभर मुस्लिमांचे वर्चस्व स्थापन करण्याच्या नादात हिंदू मंदिरांची तोडफोड व त्यातील देवतांची विटंबना करण्यात आली.त्या आघातातून हे मंदिरसुद्धा सुटले नाही. यवनांच्या क्रूर कृत्यास ते बळी पडले. (इथून सुमारे दहा कि.मी. अंतरावर पूर्वीची निजामशाही सुरू होते.) मंदिराची आणखी क्षती होऊ नये, त्यावर क्रूरकर्म्याची नजर पडू नये म्हणून स्थानिकांनी मनावर दगड ठेवून प्रस्तुत मंदिर दगड – माती टाकून झाकून टाकले. पुढे मुघल साम्राज्य लयास गेले. इंग्रजांची सत्ता आली. त्यांच्याच अमदानीत इ.स. १८४० ते १८६० च्या दरम्यान या परिसरात उत्खनन करण्यात आले. ते करीत असताना नकळत मजूरांच्या हातांनी कळसाचा काही भाग तोडला गेला. मात्र, त्यातून खाली काहीतरी असावे, या भावनेने नंतरचे कार्य आहिस्तेकदम करण्यात येऊन आजच्या घडीस दिसणारा परिसर उघडा करण्यात आला. तुटलेला भाग मात्र पूर्ववत करण्यात अपयश आले. याला कारण म्हणजे दहाव्या शतकात असलेली कला व ती साध्य असलेले कारागीर लोप पावलेले होते. ज्यांनी नंतर हे काम केले, ते फक्त मशिदी व राजवाडे बांधण्यात कुशल होते. त्यामुळे त्यांच्या बकुबाप्रमाणे हे बांधकाम केले.

मुख्य मंदिर दोन मीटर उंच आणि शंभर फूट लांब/रुंद अष्टकोनी चौथऱ्यावर उभे असून ते सात स्तरात साकारण्यात आला आहे. पहिले दोन स्तर रांगोळीचे, तिसरा गाईच्या खुरांचा, चौथा ब्रह्मदेवाचे वाहन असलेल्या हंसाकृतींचा, पाचवा विष्णुप्रिय कमलकलीकांचा, सहावा कीर्तिमुखांचा, तर सातवा स्तर आहे उत्सव साजरा करण्याचे प्रतीक असलेल्या पताकांचा. कीर्तिमुखाचे कामच लोकांनी केलेली पापे खाण्याचा आहे. त्यामुळे भक्तगण मंदिरात सोपान चढत असतानाच त्यांची पापे नाहीशी होतात व ते शुद्ध मनाने देवाचे दर्शन घेऊ शकतात, अशी श्रद्धा त्यांच्या मनात असते.

मंदिराचा बाह्य भाग पौराणिक तसेच श्रृंगारीक शिल्पांनी नटलेला आहे. या मागे लढायांचा वीट येऊन संन्यास घेण्याच्या प्रयत्नात असणाऱ्यांना परत गृहस्थाश्रमात आणण्यासाठी आणि तरुणांना त्यांच्या आवडीचे काहीतरी बघायला मिळावे असे काहीतरी देण्याचा तेंव्हाच्या राजांचा प्रयत्न असावा. मंदिराच्या दक्षिणेकडील भागात जरा वरच्या अंगाला बाह्य भागावर एक देऊळवजा मंदिर दिसते. सध्या ते रिकामे असले तरी कधीकाळी तिथे भगवान विष्णूचे वराहरूप होते. विष्णूचे शयन म्हणून इथे नागाच्या वेटोळ्या दिसतात. दक्षिण– पश्चिम कोपऱ्यात चवताळलेल्या चंडिकेचे शिल्प आहे. या शिल्पात तिने केसांचा बुचडा बांधलेला असून त्यात कर्णफुले विशिष्ट पद्धतीने खोवल्यामुळे तो झुकलेला नाही. देवीचे डोळे अंगार ओकतांना दिसतात. पायापाशी मृत्यूच्या भयाने राक्षस गयावया करीत असल्याचे आढळते. डॉ. कोलतेंच्या मते हे शिल्प लढवय्या भारतीय स्त्रीचे आहे. जेव्हाजेव्हा आपत्ती ओढवते, पुरुष मंडळी हतबल होते तेंव्हातेंव्हा अबला सबला होतात, चंडिकेचे रूप धारण करतात आणि जे कार्य पुरुष करू शकत नाहीत, ते कार्य त्या सहज करून टाकतात. पलीकडील शिल्पात भैरवनाथासोबत त्यांच्या पायात कुत्रा आहे. कुत्रा म्हणजे लाचारीचं प्रतीक. या शिल्पाच्या वर भगवान विष्णुला वारा घालणाऱ्या दासी /शलाका दिसतात. आणखी पुढे आलात तर पश्चिमेला श्रीकृष्णाचा जन्म झाल्यावर वासुदेव मथुरेहून वृंदावनाकडे त्याला नेत असताना त्यांना सहयोग करणारे शिपाई या शिल्पात दिसतात. यावेळी पोटचा गोळा दूर जाताना आई देवकीचा विलाप, तिचे कपड्यांचे भान नसणे आदी भाव कलात्मकरीत्या जिवंत केलेले आहेत. कंसाच्या सैनिकांची वासुदेवाला मदत म्हणजे प्रजा आणि सैन्य कंसाच्या जुलमी कारभाराला कंटाळले होते, हे दर्शवते. या शिल्पानंतर पुढ्यात येते ते उतरत्या सूर्याच्या किरणांनी न्हाऊन निघालेल्या इराणीयन पद्धतीचे सूर्यमंदिर. इथे सूर्याची पत्नी सोबत असून सूर्याच्या

धगीपासून संरक्षण म्हणून तिने पायात गमबुट घातलेले दिसतात. पारशी समुदायाचं हे श्रद्धास्थान असल्याने देश-विदेशातून पर्यटक इथे येत असतात. बहुधा हे शिल्प इराणच्या राजांनी चालुक्यांना मैत्रीचं प्रतीक म्हणून दिलं असावं, असा समज आहे. यापुढे 'दर्पण' शिल्प आहे.. त्यात आरशात पाहून श्रृंगार करणारी महिला दिसते. पूर्वीच्या काळात तांबे किंवा पितळेच्या पत्र्याच्या चकाकणाऱ्या पृष्ठभागावर रूप बघून मेकअप करण्यात येई. बाजूलाच विषकन्येची मूर्ती आहे. याचे वैशिष्ट्य म्हणजे कारागीराने कुठेही विषाची कुपी न दाखवता त्या सुंदर तरुणीच्या हातात जादूची कांडी व समोर दोन शरण आलेले सैनिक दाखवून कार्यभाग साधला आहे. जरापुढे गेलो की एका स्तंभावर ब्रह्मा, विष्णू आणि महेश या देवतांची शिल्पे दिसतात. ब्रह्माचे आणखी एक स्वतंत्र देऊळ याच परिसरात आहे. पुष्कर नंतर ब्रह्मदेवाचे दुसरे मंदिर लोणारलाच आहे. पुढे ईशान्य दिशेला उजव्या सोंडेचा गणपती आणि नृसिंहाचे सुंदर शिल्प दृष्टीपथात येतात.

मुख्य मंदिराच्या गाभाऱ्यात सुमारे चार फूट उंचीची विष्णूची उभी मूर्ती असून पायाखाली लवणासूर प्राणाची भिक मागताना दिसतो. प्रस्तुत मूर्ती १८६० साली नागपूरकर भोसल्यांनी लोणार वासियांच्या विनंतीस मान देऊन दान केलेली आहे. गाभाऱ्यात भिंतीतच दोन लॉकर्स दिसतात. इथे भगवान विष्णूचे दागिने ठेवण्याची व्यवस्था असावी. त्रिवेंद्रम येथील पद्मनाभस्वामी मंदिरानंतर अशी व्यवस्था असणारे हे दुसरे मंदिर असू शकते. हे लॉकर्सच्या बाह्यबाजूस अनुक्रमे महिषासूर मर्दिनी आणि नृसिंहाची शिल्पे आहेत. गाभाऱ्यात वरच्या चार कोपऱ्यात 'थ्री डी ' स्टाईलमध्ये कंस, हिरण्यकशिपू, लवणासूर आणि कालियामर्दन वध ही शिल्पे कोरलेली आहेत. हिरण्यकशिपू वधात नृसिंह उग्र रूपात खाली पडलेल्या हिरण्यकशिपूचे पाय डाव्या व उजव्या हातांनी ओढून मांडीवर घेताना दिसतो; तर लवणासूर वधात त्याच्या दोन्ही बहिणी त्याचे डोके मांडीवर घेताना एका बाजूला, तर दुसऱ्या बाजूला गाय तोंडातून पाणी काढून विष्णूचे पाय धुताना दिसते.

गाभाऱ्यातून बाहेर पडलो की समोरच्या पटांगणात काहीं स्तंभ उघड्यावर पडलेले दिसतात. त्यावर एखादा दगड ठोकून बघितले तर वेगवेगळे सप्तसुरांचे नाद निघतात.

हे मंदिर नवरात्रीच्या नऊ दिवसांत बांधून पूर्ण केले अशी आख्यायिका आहे. याचा अर्थ चौथरा बांधून झाल्यावर या मंदिराची शिल्पे, शिळा वगैरे भाग दुसरीकडे अगोदरच तयार करून नवरात्रीच्या दिवसांत फक्त इथे जुळणी केली आणि मंदिर पूर्णत्वास नेले.

काही असो, मंदिराबाहेर आल्यानंतर बघितलेल्या शिल्पांचे मनन केले असता समजून येते की, ही सारी शिल्पे मानवी मानसिकतेचे प्रतिनिधित्व करीत आहेत. उदाहरणार्थ, काम - श्रृंगारिक शिल्पे.., क्रोध - गाभाऱ्यातील कालियामर्दन, लवणासूर, हिरण्यकशिपू आणि कंस वध, मोह - वासुदेवाचे मथुरेहून वृंदावनाकडे प्रयाण व माता देवकीचा विलाप.., माया - खांबातून निघणारे सप्तसुरांचे ध्वनी..! मंदिराची एकूण रचना पंचमहाभूतांवर आधारित आहे.

त्यामुळेच डॉ. वि. भि. कोलते या मंदिरासंबंधी बोलतात, 'मानवाची मानसिकता आणि त्याचा मनोभाव या देऊळ रचनेत गुंफल्याने मानवाच्या विकासाचा मार्ग या देवळाच्या स्थापत्याने सुकर करण्याचा प्रयत्न केला आहे.'

मला वाटते, सरतेशेवटी मानवाचं शरीर पंचमहाभूतांनी बनलेले आहेच, पण त्याच्या जोडीला मानवाचे मन, बुद्धी आणि अहंकार समजून कोणतेही स्थापत्य उभारले तर या साऱ्यांचा समतोल राखला जाऊ शकतो; मग ते माणसाने उभारलेले देऊळ असो वा त्याचे राहते घर!

**- दिलीप नारायण वंडलकर**

४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,

नागपूर - ४४००२५

मो.नं.: ९८३४६३६६५५

इ-मेल- wandalkardilipgmail.com

अन्याय करणे हे पाप आणि होणारा अन्याय सहन करणे किंवा उघड्या डोळ्यांनी पाहणे हे 'महापाप' आहे.

# परिसर वार्ता

**- संकलित**

## बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय

### ग्रंथालय विभागातर्फे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती साजरी

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या २९८व्या जयंती निमित्त ३१ मे २०२२ रोजी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच त्यांच्यावरील माहितीचे प्रदर्शन ग्रंथालयात भरवण्यात आले.



पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती

### कनिष्ठ महाविद्यालय निकाल

बा. ना. बांदोडकर विज्ञान स्वायत्त कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ९४% लागला. ४६ विद्यार्थी विशेष प्रावीण्य श्रेणी, १४० विद्यार्थी प्रथम श्रेणी, २२७ विद्यार्थी द्वितीय श्रेणी तर २६ विद्यार्थी तृतीय श्रेणी मिळवून उत्तीर्ण झाले. कु सानिका गोरे ही विद्यार्थिनी ९५.३३% गुण मिळवून संपूर्ण महाविद्यालयांतून प्रथम आली, तर कु. रिया सूर्यवंशी ही विद्यार्थिनी ९२.६७% गुण मिळवून द्वितीय तर कु. श्रेया गोखले हिने ९१. ५०% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. कु. रुही दांडेकर आणि कु. अजिंक्य धारप या विद्यार्थ्यांनी संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले. कु. सानिका गोरे आणि कु. श्रेया गोखले या विद्यार्थ्यांनी संगणक शास्त्र विषयात २०० पैकी २०० गुण मिळवले.

बा. ना. बांदोडकर विज्ञान स्वायत्त कनिष्ठ महाविद्यालयाचा अकरावीचा निकाल ९६.२५% लागला. १०० विद्यार्थी विशेष प्रावीण्य श्रेणी, १४३ विद्यार्थी प्रथम श्रेणी, १८८ विद्यार्थी द्वितीय श्रेणी, तर ३१ विद्यार्थी तृतीय श्रेणी मिळवून उत्तीर्ण झाले. कु. निशा यादव ही विद्यार्थिनी ९३% गुण मिळवून संपूर्ण महाविद्यालयांतून प्रथम आली, तर कु. अषिका शेट्टी ही विद्यार्थिनी ९१.८४% गुण मिळवून द्वितीय, तर कु. नंदिनी चंदनशिवे हिने ९०% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

१ मे २०२३ रोजी 'महाराष्ट्र दिन' निमित्त ध्वजवंदन कॅम्पस मध्ये साजरा करण्यात आला.

प्रभारी प्राचार्य डॉ श्री विद्या जयकुमार ६ मे २०२३ रोजी अडीच महिन्यांच्या वैद्यकीय रजेनंतर कर्तव्यावर रुजू झाल्या.

११ मे रोजी महाविद्यालयाने एल.एल.बी.(३ वर्ष) शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ साठी उच्च शिक्षण विभाग (पुणे) मध्ये ऑनलाईन नोंदणी करण्यात आले.

१८ मे २०२३ रोजी महाविद्यालयाने NAAC द्वितीय सायकल मान्यतासाठी स्व-अभ्यास अहवाल सादर करण्यात आला.

प्रसिद्धी ही अशी बाब आहे जी कितीही मिळाली तरी माणसाची तहान भागत नाही!

**सत्र VI च्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा खालील वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात आल्या.**

| दिवस आणि तारीख | विषय | वेळ |
|---|---|---|
| बुधवार, ३ मे २०२३ | वैकल्पिक विवाद निराकरण प्रणाली | स. १०.३० ते दु. १.३० |
| सोमवार, ८ मे २०२३ | पुराव्याचा कायदा | स. १०.३० ते दु. १.३० |
| बुधवार, १० मे २०२३ | कायद्यांचा संघर्ष | स. १०.३० ते दु. १.३० |
| शुक्रवार १२ मे २०२३ | कायदा आणि औषध | स. १०.३० ते दु. १.३० |
| मंगळवार १६ मे २०२३ | विम्याचा कायदा | स. १०.३० ते |
| गुरुवार १८ मे २०२३ | बौद्धिक संपदा कायदा | स. १०.३० ते दु. १.३० |
| सोमवार २२मे २०२३ | बँकिंग कायदे आणि निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट कायदा | स. १०.३० ते दु. १.३० |
| बुधवार २४ मे २०२३ | महिला आणि मुलांशी संबंधित कायदा | स. १०.३० ते दु. १.३० |

**सत्र V च्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा खालील वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात आल्या.**

| दिवस आणि तारीख | विषय | वेळ |
|---|---|---|
| गुरुवार २५मे २०२३ | नागरी प्रक्रिया संहिता आणि मर्यादा कायदा | स. १०.३० ते |
| सोमवार २९ मे २०२३ | फौजदारी प्रक्रिया संहिता, बाल न्याय कायदा २००० आणि गुन्हेगाराच्या कायद्याचे प्रोबेशन कायदा | स. १०.३० ते दु. १.३० |
| बुधवार ३१ मे२०२३ | कायद्यांचे स्पष्टीकरण | स. १०.३० ते दु. १.३० |
| शुक्रवार २ मे २०२३ | सार्वजनिक आंतरराष्ट्रीय कायदा | स. १०.३० ते दु. १.३० |

**सत्र II च्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक आणि अंतर्गत परीक्षा खालील वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात आल्या.**

| दिवस आणि तारीख | विषय | वेळ |
|---|---|---|
| ६ मे २०२३ | सर्व विषय वग चाचणी (प्र.१०गुण) गुन्ह्यांचा कायदा (आय.पी.सी.), घटनात्मक कायदा, कौटुंबिक कायदा(एक), पर्यावरण कायदा | ५.०० ते ६.०० |
| ८ मे २०२३ | कौटुंबिक कायदा (एक) खुली पुस्तक चाचणी (१० गुण) | ६.०० ते ७.०० |
| १९ मे २०२३ | सर्व विषय वर्ग चाचणी (प्र. १० गुण) पुनर्परीक्षा. (गुन्ह्यांचा कायदा (आय.पी.सी.), घटनात्मक कायदा, कौटुंबिक कायदा(एक), पर्यावरण कायदा) | ५.०० ते ६.०० |

| | | |
|---|---|---|
| २० मे २०२३ | कौटुंबिक कायदा (एक) खुली पुस्तक पुनर्परीक्षा (१० गुण) | ६.०० ते ७.०० |

**१६ मे २०२३ रोजी ठाणे विधी महाविद्यालयात 'ऊर्जा संवर्धन' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले गेले होते.**

या महिन्यात महाराष्ट्रात होत असलेल्या प्रतिष्ठित G20 शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. आजच्या ऊर्जेच्या गरजा आणि कमी होत चाललेल्या स्रोतांमुळे आम्हाला ऊर्जेचे नवीन आणि स्वच्छ स्रोत शोधण्यास भाग पाडले गेले. या चर्चेने सर्वांना कार्यशाळेत गुंतवून ठेवले. आम्हाला खात्री आहे की आमचे विद्यार्थी हरीत ऊर्जेवरील या मिशनच्या संक्रमणासाठी प्रेरित आहेत. कार्यशाळा दोन सत्रात होती.

**सत्र १ ऊर्जा संवर्धन : सत्र २ शाश्वत विकास**

जिथे पहिल्या सत्रात G20 शिखर परिषदेच्या थीमवर आणि २००१ च्या ऊर्जा संवर्धन कायद्यावर २०२२ च्या ताज्या सुधारणांसह लक्ष केंद्रित केले गेले, दुसरे सत्र ऱ्हास होत चाललेले पर्यावरण, घटणारी सं-साधने आणि शाश्वत विकास हा एकमेव तारणहार आहे.

**सत्रांचे तपशील:**

सत्र १ ऊर्जा संवर्धन

ऊर्जा संवर्धन कायदा २००१ वर व्याख्यान सौ. रश्मी नाटेकर प्राध्यापक ह्यांनी दिले. त्यात खालील माहितीचा देखील समावेश होता

A) डॉ. अजय देशपांडे, सहायक प्राध्यापक आयआयटी बॉम्बे माजी सदस्य एनजीटी ह्यांनी कायद्यातील २०२२ ची दुरुस्ती ह्या विषयावर भाष्य केले.

B) प्रोफेसर डॉ. बी.आर. नटराजन, व्यवसाय आणि केमिकल अभियांत्रिकी विभाग प्रमुख बनस्थली विद्यापीठ राजस्थान, माजी कुलगुरू संघम विद्यापीठाचे माजी डीन, BITS पिलानी यांनी ऊर्जा संक्रमण परिस्थिती आणि पर्यावरणासाठी जीवनशैली यावर भाष्य केले.

**सत्र २ शाश्वत विकास**

शाश्वत विकासासाठी ऊर्जा संवर्धन या विषयावर श्री. प्रशांत मानूरकर (सुरक्षा तज्ज्ञ) RMC रेडी मिक्स इंडिया आणि एचआर जॉन्सन इंडियाचे वरिष्ठ महाव्यवस्थापक ह्यांनी आपले विचार मांडले.








भाषणानंतर प्रश्नोत्तराचे सत्र झाले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक सौ. कृष्णा कामत ह्यांनी केले. प्रभारी प्राचार्य डॉक्टर श्रीविद्या जयकुमार यांनी उपस्थितांचे स्वागत करून वक्त्यांचा सत्कार केला. वक्त्यांनी या विषयातील त्यांचे कौशल्य विद्यार्थ्यांसमोर मांडले, ज्यामुळे खूप उत्सुकता आणि चर्चा झाली. आभार प्रदर्शनानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**२० मे २०२३ रोजी सेमीस्टर – I निकाल लावण्यात आला.**

**पुनर्मूल्यांकन सेमीस्टर – III निकाल लावण्यात आला.**

श्रीमंताचे बंगले चांगले असतात; पण म्हणून कोणी आपल्या झोपड्या पाडत नाहीत!

**सत्र IV च्या विद्यार्थ्यांच्या पूर्व तयारी परीक्षा खालील वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात आल्या.**

| तारीख | विषय | वेळ |
|---|---|---|
| २१ मे २०२३ | न्यायशास्त्र | ५.०० ते ७.०० |
| २५ मे २०२३ | करार दोन | ५.०० ते ७.०० |
| २६ मे २०२३ | जमीन कायदा | ५.०० ते ७.०० |
| २७ मे २०२३ | गुन्हेगारी; कर आकारणी; दिवाळखोरी कायदा | ५.०० ते ७.०० |

**२२ मे २०२३ रोजी उन्हाळी सुट्टी**

एल.एल.बी. विद्यार्थांना २२ मे २०२३ ते ३० जून २०२३ पर्यंत सुट्टी आहे, परंतु १५ जुनपर्यंत प्रथम वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांचे लेक्चर्स सुरू राहतील.

**२४ मे २०२३ रोजी प्राणी व संरक्षण कायदा सर्टिफिकेट कोर्स चा निकाल लावण्यात आला.**

१७ फेब्रुवारी रोजी प्राणी संरक्षण कायदा ह्या सर्टिफिकेट कोर्सची ४ थी बॅच सुरू झाली. एकूण १० विद्यार्थ्यांनी नावनोंदणी केली, एकूण ७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. २ विद्यार्थ्यांनी O ग्रेड मिळवला, ३ विद्यार्थ्यांनी A+ ग्रेड मिळवला आणि २ विद्यार्थी A ग्रेड मिळवून उत्तीर्ण झाले.

**दिनांक २७ मे २०२३ रोजी ठाणे विधी महाविद्यालयात 'आपत्ती व्यवस्थापन ' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले गेले होते.**

**''स्वत:सोबत इतरांच्या बचावाची, शिकविली आज कला''...!!**

**''व्याख्यानाला आला, सुज्ञ तो झाला''....!!**

आपत्ती कमी करणे... जोखीम असलेल्या लोकांची आत्मनिर्भरता वाढवते – दुसऱ्या शब्दांत, ते सशक्त होते.

त्याच भावनेने, आपत्ती व्यवस्थापन कायद्यातील अतिरिक्त प्रमाणपत्र कार्यक्रमाचा एक भाग म्हणून विद्या प्रसारक मंडळाच्या विधी महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापनाचे विशेष प्रात्यक्षिक प्रशिक्षण घेण्यात आले. ज्यासाठी आम्हाला यशवंतराव चव्हाण अकादमी ऑफ डेव्हलपमेंट ॲडमिनिस्ट्रेशन (यशदा) पुणेचे दोन अपवादात्मक मास्टर ट्रेनर मिळण्याचे भाग्य लाभले, ते म्हणजे श्री. विवेक नायडू आणि श्री. लखन गायकवाड.

सायंकाळी ५.०० वाजता अधिवेशनाला सुरुवात झाली. कॉलेजच्या मनु सभागृह (मूट कोर्ट हॉल) मध्ये सहाय्यक प्राध्यापिका सौ. कृष्णा कामत यांनी सर्वांचे स्वागत करून व मास्टर ट्रेनर्सचा परिचय करून कार्यक्रमाची सुरुवात केली, त्यानंतर प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी सत्कार व स्वागतपर भाषण केले. विवेक नायडू ह्यांनी विद्यार्थ्यांची प्रशिक्षणात पूर्ण एकाग्रता मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना ब्रेन टीझर क्रियाकलापांमध्ये गुंतवून कार्यक्रमाची सुरुवात केली. श्री. नायडू यांनी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण आपल्या दैनंदिन जीवनात किती महत्त्वाचे आहे हे स्पष्ट केले कारण एखादी आपत्ती, नैसर्गिक असो वा मानवनिर्मित, कोणत्याही वेळी आणि कोणत्याही ठिकाणी आघात करू शकते आणि वाचवण्यासाठी आपण सर्व मूलभूत प्रशिक्षणांनी सुसज्ज असले पाहिजे. मर्यादित उपलब्ध संसाधनांच्या मदतीने स्वतःला आणि इतरांना देखील वाचवता आले पाहिजे. जसजसे प्रशिक्षण पुढे सरकत गेले, तसतसे अधिकाधिक मनोरंजक घटक प्रशिक्षणात समाविष्ट केले गेले.

नायडू सरांनी सांगितलेल्या काही महत्त्वपूर्ण उपाययोजना खालील प्रमाणे आहेत :

१) बोट वगैरे कापले असल्यास शुद्ध हळद लावणे किंवा लगेच बोट ३ मिनिट दाबून ठेवणे.

२) दातखिळी बसने / फिट येणे/चक्कर येणे – अशा रुग्णांना पाय वर करून डोक्याला रक्त पुरवठा होईल अशा अवस्थेत शुद्धीवर येई पर्यंत ठेवणे. शुद्धीवर आल्याची खात्री होत नाही तो पर्यंत पाणी पिण्यास देऊ नये.

३) उलटी होत असल्यास ती कधीही रोखू नये.

४) हृदय विकाराचा झटका येत असल्यास अशा व्यक्तीस CPR प्रति मिनिट १२० या प्रमाणे शुद्धीवर येईपर्यंत देणे.

५) कुत्रा चावल्यास वा इतर कोणत्याही प्राण्याने चावा घेतल्यास त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधणे.

६) साप मारलेली काठी जाळून टाकणे व सापांचे रक्त सांडले असल्यास धुऊन काढणे जेणेकरून त्या वासावर दुसरे साप येणार नाहीत.

७) जळत असलेल्या व्यक्तीला वाचवताना/ विझविताना कधीही समोरून जाऊ नये. मागून जावून ब्लँकेट टाकून त्याला खाली पाडावे/ व तसेच रुग्णालयात दाखल करावे.


८) मधमाशांनी हल्ला केल्यास पळत राहणे व श्वासावर नियंत्रण ठेवणे.

९) रस्ते अपघात ग्रस्त व्यक्तीला कधीही पाणी पाजू नये/ आवश्यकता भासल्यास रुमाल ओला करून त्याच्या ओठांना लावावे.

१०) घरातून सर्वजण बाहेर जात असल्यास गॅस सिलेंडर चा रेगुलेटर काढून सिलेंडरवर सेफ्टी कॅप लावणे/ वापर नसल्यास रेगुलेटर बंद ठेवणे / चुकून गॅस लीक झाल्यास दरवाजे व खिडक्या उघड्या करणे जेणेकरून गॅस हवे मार्फत बाहेर निघून जाईल व धोका टळेल. चुकूनही इलेक्ट्रिक बटणे चालू अथवा बंद करू नयेत. कारण बटण चालू बंद करताना आग लागण्याची शक्यता असते.

प्रशिक्षणाच्या शेवटी, आमच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या बास्केटबॉल कोर्टवर नेण्यात आले, जिथे त्यांना अत्यंत सावधगिरीने आणि सुरक्षिततेने आग विझवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. कारण असे वारंवार आढळून येते की, आपल्या परिसरात फायटर फायटिंग एक्टिंग्विशर्स उपलब्ध असूनही, ते कसे उघडायचे आणि त्यांचा प्रभावीपणे वापर कसा करायचा हे आपल्याला क्वचितच माहीत असते.

भाग घेतलेले सर्व विद्यार्थी खूप उत्साही होते आणि त्यांनी सर्व प्रशिक्षण उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. उत्कृष्ट आणि परस्परसंवादी प्रशिक्षण दिल्याबद्दल आम्ही प्रशिक्षकांचे आभारी आहोत. कार्यक्रमाची सांगता अतिथी प्राध्यापकांच्या कृतज्ञतेने झाली. विद्यार्थ्यांनी ह्या कार्यशाळेस उत्तम प्रतिसाद दिला.




उषःकालाकडे जाण्याचा एकमेव मार्ग आहे तो म्हणजे 'रात्र!'

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

NIRF - Innovation (ARIIA) २०२३ चा निकाल ५ जून २०२३ रोजी जाहीर झाला. श्रीयुत राजकुमार रंजन सिंग (Minister of State for Education & External Affairs) यांनी निकाल जाहीर केला. २०२१-२२ ला विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाला अनेक उपक्रमांच्या सहभागासाठी ''NIRF - Innovation Ranking'' साठी प्रमाणपत्रांने सन्मानित केले. वरील उपक्रमासाठी सौ. राजश्री पाटील (ARIIA Coordinator) व IIC Coordinators नी अथक परिश्रम केले. विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन हे एकमेव तंत्रनिकेतन आहे ज्याला हा सन्मान मिळाला आहे.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**मे २०२३ मधील कार्यक्रम / वार्ता**

**४ व ५ मे :** डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, रत्नागिरी येथील ग्रंथालयातील सेवक वर्गाला कोहा या आज्ञावलीच्या २ दिवसीय प्रशिक्षण सत्रा साठी ब्रिम्सचे ग्रंथपाल श्री. संजय सपकाळ यांना आमंत्रित करण्यात आले. या दोन दिवसाच्या कालावधी मध्ये ग्रंथालयाच्या प्रमुख सौ. सीमा आवरे, सहाय्यक ग्रंथपाल श्री. माताप्रसाद मुखेडकर, ग्रंथालय लिपिक सौ. स्नेहा कारले आणि ग्रंथालयातील इतर सेवक वर्ग उपस्थित होते. दिनांक १८ मे, १९७२ रोजी स्थापन




झालेल्या या कृषी विद्यापीठाच्या ग्रंथालयाची ग्रंथसंपदा ही ५५००० च्या वर असून ग्रंथालय हे आधुनिक सोयींनी सुसज्य आहे.



**६ मे :** डॉ. व्ही. एन. ब्रिम्स येथे एम.एम.एस. २०२०-२२ तुकडीचा दीक्षांत समारंभ संपन्न झाला.




गो टू मार्केट बिझनेस एक्सलन्स, ब्रेनटॅग एसई, जर्मन केमिकल या वितरण कंपनीचे ग्लोबल डायरेक्टर, श्री. संजय गुप्ता, यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना आयुष्यभर शिकण्याचा सल्ला दिला आणि नमूद केले की, पैशाच्या मागे लागू नका; शिकण्याच्या आणि नवीन कौशल्ये आत्मसात करण्याच्या मागे लागलात की; पैसाच तुमचा पाठलाग करेल.




ज्या गोष्टी कधीच बदलू शकत नाहीत त्यांच्याविषयी कधीही दुःखी होऊ नये.

**६ मे–१२ मे :** डॉ. श्रीपाद बापट आणि सहाय्यक. प्रा. प्रथमेश उ. तावडे यांनी भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या PMMMNMTT योजने अंतर्गत गुरू अंगद देव टीचिंग लर्निंग सेंटरच्या सहकार्याने, सेंट फ्रान्सिस इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च (SFIMAR) तर्फे आयोजित केलेल्या आउटकम बेस्ड युकेशन: पॅराडिइम शिफ्ट इन हायर एड्युकेशन या विषयावरील एका आठवड्याचा ऑनलाइन प्राध्यापक विकास / प्रमाणपत्र कार्यक्रम पूर्ण केला.





Guru Angad Dev
TEACHING LEARNING CENTRE
A Centre under Pandit Madan Mohan Malaviya National Mission on Teachers and Teaching (PMMMNMTT), MHRD, Govt. of India.
SRI GURU TEGH BAHADUR KHALSA COLLEGE
UNIVERSITY OF DELHI

12th May, 2023

Provisional Certificate
To whom it may concern

This is to certify that **PRATHMESH U TAWADE, DR. V N BRIMS** has participated in One-Week Online National Faculty Development Program/Certificate Program on **"Outcome Based Education: Paradigm Shift in Higher Education"** organized by Guru Angad Dev Teaching Learning Centre, a Centre under PMMMNMTT, Ministry of Education, Government of India in collaboration with St. Francis Institute of Management and Research held from **06th May to 12th May, 2023.**

The final certificate with grades will be issued subject to successful completion of various activities.

Prof. (Mrs.) Vimal Rarh
Project Head & Joint Director
GAD-TLC of Ministry of Education

**१७ मे :** डॉ. कांचन, प्रा. सिद्धेश आणि केतकी यांनी कर्मचारी विकास समिती तर्फे, 'तुमच्या बालपणीच्या आठवणी पुन्हा जगा' या मैदानी खेळांच्या उपक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमात शिक्षक, शिक्षकेतर आणि उप-कर्मचारी सदस्यांनी विविध खेळ आणि सांघिक उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला.

**१७ मे :** डॉ. व्ही. एन. ब्रिम्स च्या सीएसआर समितीने 'पर्यावरणपूरक शाश्वत जीवन शैली' या विषयावर ऑनलाइन सत्राचे आयोजन केले.







**१७ मे :** विप्रमंचे बी. एन. बांदोडकर संचालित यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या केंद्रामध्ये एमलिब या कोर्ससाठी संगणक प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यासाठी अंतर्गत परीक्षक (Internal Examiner) म्हणून श्री. संजय सपकाळ यांना आमंत्रित करण्यात आले.



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
केंद्र – विद्या प्रसारक मंडळ संचलित
बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), चेंदणी, बंदर रोड, ठाणे – ४०० ६०१. ज्ञानगंगा घरोघरी
दूरध्वनी – २५३३ ६५०७

जावक क्र. : BNBYC/40 दिनांक : 12/05/202

To,
Mr Sanjay Sapkal,
Librarian,
Dr V.N.BRIMS
Thane

Sub : Invitation as an Internal Examiner.

Dear Madam,

Our center conducts Bachelor of Library and Information Science & Master of Library and Information Science course affiliated to Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik.

We would like to invite you as an Internal Examiner for MLISC Practical exam on 17th May 2023.

This is request you to kindly accept our invitation.

Thanking you in anticipation.

With Warm Regards,

Your's Truly,
Mrs. Kadambari H Manjrekar
Co-ordinator.


३५५२ A ग्रंथालय

**१८ मे :** डॉ. कांचन यांनी माइंडस्टेक्स लॅब, पुणे येथील कर्मचाऱ्यांसाठी आर्ट ऑफ कम्युनिकेशन या विषयावर एक सत्र आयोजित केले.







**१९ मे :** प्रा. दीप्ती पेरीवाल यांनी लिहिलेली रोड अहेड – पोस्ट कोलॅप्स पंजाब अँड महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह बँके ही केस स्टडी स्कोपस आणि ए बी डी सी अनुक्रमित नियतकालिकातर्फे प्रकाशनासाठी स्वीकारण्यात आली.





**२० मे :** श्री. संदीप मोघे आणि डॉ. श्रीपाद बापट यांनी लिहिलेला शोधनिबंध, स्कोपस अनुक्रमित नियतकालिक युरोपियन केमिकल बुलेटिन खंड १२ – विशेष अंक ४ –(२०२३) ISSN-२०६३ ५३४६ मध्ये प्रकाशित झाला.




**२४ मे :** डॉ. पंकज नांदूरकर आणि श्री. चैतन्य पवार लिखित 'डिजिटल मार्केटिंग इम्प्लिमेंटेशन' आणि 'क्रिटिकल थिंकिंग इन डिजिटल अँड सोशल मीडिया मार्केटिंग' ही दोन पुस्तके स्वयं अध्ययन साहित्य म्हणून, विकास पब्लिकेशन तर्फे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासाठी प्रकाशित करण्यात आली.



**२९ मे :** डॉ. व्ही. एन. ब्रिम्स च्या सी एस आर समितीतर्फे गो ग्रीन सप्ताहाची सुरुवात करण्यात आली.




## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था – ग्रंथालयाची माहिती

ग्रंथालयामार्फत एप्रिल आणि मे या महिन्यात एकूण ४१ नवीन पुस्तके घेण्यात आली. तसेच सदस्यत्त्व असलेल्या नियतकालिकांमधील २५६ लेखांचे कोहा या ग्रंथालय प्रणाली मध्ये तालिकीकरण करण्यात आलेले आहे. हे सर्व लेख ग्रंथालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सर्व नियतकालिके आणि माहितीसंग्रह हे ग्रंथालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. opac.vpmthane.org:50400

एप्रिल आणि मे या महिन्यामध्ये शिक्षक आणि विद्यार्थी यांनी मिळून ७८५ पुस्तकांची देवाणघेवाण केली त्यामध्ये

१) देवघेव केलेली पुस्तके : ३२३
२) नूतनीकरण केलेली पुस्तके : १६६
३) परत आलेली पुस्तके : २९६


## सर्वोत्कृष्ट ग्रंथालय वापर–कर्ता

एप्रिल आणि मे २०२३ मध्ये सर्वाधिक पुस्तके घेणारे सभासद


१) प्राध्यापक : सौ. जान्हवी पोतदार – ४३ वेळा

२) विद्यार्थी : अभिषेक सुरेश गुप्ता – २५ वेळा – वशिष्ट बॅच.


- निम्ब्स या प्रणालीचा वापर करून EBSCO eBooks या माहिती संग्रहाचा विषयानुसार केलेला वापर




- प्रकाशकानुसार व विषयानुसार मोबाईल अँपच्या माध्यमातून केलेला वापर




- m-Library मोबाईल अँपचा जास्तीत जास्त वापर करणारे वापरकर्ते




●●●

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**संपर्क**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.